## आजपासून एसटी कर्मचारी संपावर

**मुंबई :** एसटी कर्मचारी संघटनेने उद्या मंगळवारपासून (दि. ३) राज्यभर बेमुदत आंदोलन पुकारले आहे. आर्थिक बाबी, खासगीकरण अशा विविध मागण्या विधानसभेची आचारसंहिता लागण्याआधी मान्य करा, असा इशारा देत एसटी कर्मचारी संघटनेने बेमुदत संप पुकारला आहे. ऐन गणेशोत्सव काळात लालपरीला ब्रेक लागणार असल्याने सामान्यांचे हाल होण्याची शक्यता आहे. एसटी कामगारांच्या आर्थिक मुद्द्यांची सोडवणूक तातडीने व्हावी यासाठी सोमवार, दि २ सप्टेंबर रोजी राज्यभर उग्र निदर्शने झाली, तर उद्यापासून बेमुदत संप पुकारण्यात आला आहे.


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. ३ सप्टेंबर २०२४

किंमत ४ ₹







**आजचा अग्रलेख**

**बघता काय, सामील व्हा**

## वे|ध|क

### आदिवासी बेघर

**रसायनी :** चौक आदिवासी वाडी येथील किसन विठ्ठल कातकरी यांचे घर पावसाच्या थैमानात पूर्णपणे जमीनदोस्त झाले आहे. त्यामुळे त्यांचे मोठे नुकसान झाले असून, ते बेघर झाले आहेत. गेले काही दिवस पुन्हा पावसाने जोरदार संततधार लावली असून, चौक येथील आदिवासी वाडीतील किसन विठ्ठल कातकरी यांचे घर मध्यरात्री जमीनदोस्त झाले आहे. हे घर कुडामेडीचे, कौलारू होते. झोपेतच मध्यरात्री घर जमीनदोस्त झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, सुदैवाने जीवितहानी न झाल्याने सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

### याचिका फेटाळली

**मुंबई :** 'आनंदाचा शिधा' कंत्राटप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला मोठा दिलासा दिला आहे. कंत्राट देताना सर्व अटींची पूर्तता केल्याच्या सरकारच्या भूमिकेवर मुंबई उच्च न्यायालयाची सहमती झाली असून, ४० कोटींहून कमी किमतीत काम करण्यास तयार असलेल्या दोन कंपन्यांना अपात्र ठरवण्याचा सरकारी निर्णय योग्यच असल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने मांडले आहे. सर्व अटींची पूर्तता केलेली असतानाही सरकारनं अपात्र ठरवल्याचा कंपनीचा आरोप होता. त्यांनी दाखल केलेली याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली आहे.

### राज्य सरकारांना 'सर्वोच्च' चपराक

**नवी दिल्ली :** विविध प्रकरणांतील आरोपींवर बुलडोझर चालवण्याच्या कारवाईला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सोमवारी (दि. २) सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयानं महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवताना राज्य सरकारांना जबरदस्त चपराक लगावली आहे. एखाद्या व्यक्तीला दोषी ठरवूनही घर पाडता येत नाही, असं निरीक्षण सर्वोच्च न्यायालयानं नोंदवलं आहे; फक्त तो आरोपी आहे म्हणून घर कसे पाडले जाऊ शकते? तो दोषी असला तरी त्याचे घर पाडता येणार नाही, अशी टिप्पणी न्यायमूर्ती बी.आर. गवई यांनी केली.

### जिल्हाधिकारी तावडेंची बदली

**सिंधुदुर्ग :** छत्रपती शिवाजी महाराजांचा राजकोट किल्ल्यावरील पुतळा कोसळल्यानंतर राज्यभरातून तीव्र संतापाची लाट उसळली आहे. त्यातच आता जिल्हाधिकारी किशोर तावडे यांची तडकाफडकी बदली करण्यात आली असून, राज्य फार्मिंग कार्पोरेशन पुण्याच्या व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती केली आहे. तर, हाफकिनचे व्यवस्थापकीय संचालक अनिल पाटील यांची जिल्हाधिकारीपदी वर्णी लावण्यात आली आहे.

### भाजपाला सुरूंग

**कोल्हापूर :** राजकीय विद्यापीठ म्हणून ओळख असलेल्या कागल विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी अखेर भाजपला सुरुंग लावला आहे. देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय असलेले आणि हसन मुश्रीफ यांचे कट्टर विरोधक असलेले समरजितसिंह घाटगे हे भाजपशी काडीमोड करून तुतारी हातात घेणार आहेत. मंगळवारी (दि. ३) कागल येथील गैबी चौकात शरद पवार यांच्या उपस्थितीत समरजित घाटगे यांचं पक्ष प्रवेश होणार असून, यासाठी शरद पवार कोल्हापुरात दाखल झाले आहेत.

# रायगडला डेंग्यूचा 'ताप'




**प्रमोद जाधव**

**| अलिबाग |**

**रायगड जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसांपासून डेंग्यूचा प्रादुर्भाव वाढला आहे. जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यांच्या कालावधीत २८२ हून अधिक डेंग्यूचे रुग्ण सापडले आहेत. जिल्हा परिषद आरोग्य यंत्रणेची धावाधाव सुरु झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण आरोग्य यंत्रणा सलाईवर असल्याचे चित्र दिसून येत आहे.**

### आरोग्य विभागाचा चालढकलपणा

जिल्ह्यात डेंग्यूचे रुग्ण वाढत असल्याबाबत आरोग्य अधिकारी विखे यांच्याशी संपर्क साधला असता, 'मी बाहेर आहे, जयस्वाल यांच्याकडे माहिती आहे,' असे सांगितले. त्यानंतर ही माहिती घेण्यासाठी जयस्वाल यांच्याशी संपर्क साधला असता, हिवताप कार्यालयाकडे ही माहिती असल्याचे सांगून आपल्याकडील जबाबदारी हिवताप कार्यालयाकडे ढकलण्याचा प्रकार केल्याचे दिसून आले.

रायगड जिल्ह्यात ग्रामीण भागातील लोकसंख्या सुमारे १६ लाख ६४ हजार असून, जिल्ह्यात गावे, वाड्या सुमारे दोन हजारांपेक्षा अधिक आहेत. जिल्ह्यातील ग्रामीण आरोग्य यंत्रणा मजबूत ठेवण्यासाठी जिल्हा परिषदेच्या अखत्यारित ५५ आरोग्य केंद्र, जिल्हा परिषद दवाखाने, २८० आरोग्य उपकेंद्र आहेत. या संस्थांमार्फत ग्रामीण •> पान २ वर

### आठ जणांचा मृत्यू

रायगड जिल्ह्यात जानेवारीपासून ऑगस्ट या आठ महिन्यात आठ जणांचा मृत्यू झाला आहे. जिल्ह्यात मृत्यूचे प्रमाण कमी असले, तरीही हे रुग्ण वाढण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे आरोग्य विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

> "जिल्ह्यामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून डेंग्यूचे रुग्ण सापडत आहेत. या घटनेनंतर गावागावात जाऊन सर्वेक्षण करण्यास सुरुवात केली आहे. ज्या भागात पाणी साचले असेल, तो भाग कोरडा करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तपासणीदेखील या विभागामार्फत केली जात आहे. डेंग्यूला रोखण्यासाठी घरात तीन-चार दिवस पाणी साठवून ठेवू नका, असे आवाहन करण्यात येत आहे."
>
> – डॉ. मनिषा विखे, जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, आरोग्य विभाग

## ग्रामीण रुग्णालयाला अद्याप टाळेच

**| तळा | वार्ताहर |**

तळा येथे मोठा गाजावाजा करून आरोग्य विभागामार्फत ग्रामीण रुग्णालय सुरू करण्यात आले. परंतु, या ग्रामीण रुग्णालयाची भव्य वास्तू शोभेचे बाहुले बनले असून, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांअभावी या रुग्णालयास टाळे लावण्यात आले आहे. शासनाचा करोडो




रुपयांचा चुराडा झाला असून, परिसरातील रुग्णांची आरोग्याची हेळसांड होत आहे.

या रुग्णालयात अधिकारी वर्ग आणि कर्मचारी यांची पदे अजून भरण्यात आलेली नाहीत. महाआघाडीचे सरकार असताना राज्याच्या तत्कालीन पालकमंत्री अदिती तटकरे यांनी दि.२८ जून २०२२ रोजी ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन केले होते. परंतु, लोकार्पण केल्यानंतर हे रुग्णालय •> पान २ वर

### रेवदंडा आरोग्य केंद्रातील घटना

# सुधीर चेरकरची महिलेला मारहाण

- आरोपीवर रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल
- वादाशी काही संबंध नसताना अश्लील शिवीगाळ

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

महिला फिर्यादीने पतीला उपचाराकरिता रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात रात्रीच्या सुमारास आणले असता, भाजपाचा कार्यकर्ता असलेल्या वरंडे ग्रामपंचायतीच्या माजी सरपंचाने त्याठिकाणी येऊन काहीही संबंध नसताना अश्लील शिवीगाळ करुन तिला मारहाण केली. याप्रकरणी त्याच्याविरोधात रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जखमी महिलेच्या पतीसोबत घरातील मंडळींसोबत किरकोळ कारणावरून भांडण झाले होते. त्यामध्ये महिलेचा पती जखमी झाल्याने त्यांना रेवदंडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल केले.

दरम्यान, ३१ ऑगस्ट रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास माजी सरपंच सुधीर चेरकर याने रुग्णालयात जाऊन त्या महिलेला शिवीगाळी करून तिला मारहाण केली. यामध्ये ती महिला जखमी झाली. याप्रकरणी सुधीर चेरकरविरोधात रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार अनुष्का पुळेकर करीत आहेत.

### अंमलदाराकडून माहिती देण्यास टाळाटाळ

**भाजपच्या कार्यकर्त्याकडून एका महिलेला मारहाण करण्यात आली. याबाबत रेवदंडा पोलीस ठाण्यातील तपासिक अंमलदार यांच्याशी संपर्क साधला असता, या घटनेची माहिती देण्यास त्यांनी टाळाटाळ केली. कोणताही गुन्हा घडला नसून, तपास माझ्याकडे काहीच नाही असे बोलून त्यांनी या विषयाला पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला.**

## विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव तालुक्यातील मोर्बा येथील २५ वर्षीय विवाहित महिलेने पतीसोबत झालेल्या भांडणाच्या रागातून गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेची खबर सुहेल मुसबहा चौधरी (३०) रा. मोर्बा, ता. माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

या घटनेबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळाली माहिती अशी की, घटनेतील मयत महिला शहीदा सुहेल चौधरी (२५) रा. अन्वर सोलकर यांची चाळ, पहिला मजला, रूम नं.१, मोर्बा, ता. माणगाव हिने तिच्या पतीसोबत झालेल्या भांडणाच्या रागातून तिच्या राहत्या घरातील लोखंडी पाईपला काळ्या रंगाच्या ओढणीने •> पान २ वर

# लालबागमध्ये गर्दीत घुसली बेस्टची बस

## तरुणीला चिरडले, आठ जण जखमी

**| मुंबई | प्रतिनिधी |**

गणपती आगमन मिरवणुका आणि खरेदीसाठी नागरिकांनी रविवारी केलेल्या गर्दीमध्ये बेस्टची बस शिरल्याची घटना मुंबईत घडली. लालबाग राजा येथील गरम खाडा मैदानासमोर हा धक्कादायक प्रकार घडल्याचे समोर आले आहे. बसमधील दारूड्या प्रवाशाने चालकासोबत हुज्जत घालत स्टेअरिंग जबरदस्तीने फिरवल्याने हा अपघात झाल्याची माहिती आहे. या अपघातामध्ये २८ वर्षीय नृपूर मणियार या तरुणीचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, आठ जण जखमी झाले आहेत. या अपघातात रस्त्यावरील अनेक वाहनांचेही नुकसान झाले.

बेस्ट बसची मार्गिका क्रमांक ६६ ही बस लालबागहून जात असताना रविवारी रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास हा प्रकार घडला. बेस्ट बसमधील दारुड्या प्रवाशाने क्षुल्लक कारणावरून चालकासोबत वाद घातला. हा वाद इतका विकोपाला गेला, की प्रवाशाने डाव्या बाजूने स्टेअरिंग हातामध्ये घेत कसेही फिरवले. यामुळे चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनांना धडकली.

अचानक बस वेडीवाकडी चालू लागल्याने या ठिकाणी असलेल्या नागरिकांमध्ये •> पान २ वर


# जि.प.ने सारांशला दिली श्रवणशक्ती

**सेस फंडातून केली सहा लाखांची आर्थिक मदत**

**| रायगड | खास प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील मेढेखार गावातील सारांश प्रशांत ठाकूर या साडेचार वर्षीय मूकबधिर बालकाच्या चेहऱ्यावर हसू फुलले आहे. या बालकावर श्रवणशक्ती सुधारण्यास मदत करणारी कॉक्लियर इम्प्लांटशस्त्रक्रियानुकतीचमुंबईतील रुग्णालयात यशस्वीपणे करण्यात आली आहे. या शस्त्रक्रियेसाठी ६ लाख ८ हजार रुपयांची मदत रायगड जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून करण्यात आली.

सोमवारी (दि.२) सारांशच्या आईवडिलांनी सारांशसह •> पान २ वर



### कॉक्लियर इम्प्लांट कसे कार्य करते

**कॉक्लियर इम्प्लांटमध्ये दोन मुख्य घटक असतात. एक बाह्य प्रोसेसर आणि अंतर्गत इम्प्लांट. बाह्य प्रोसेसर वातावरणातील ध्वनी कॅप्चर करतो आणि त्यांचे डिजिटल सिग्नलमध्ये रूपांतर करतो. हे सिग्नल मॅग्नेट आणि स्कॅल्पवर ठेवलेल्या कॉइलद्वारे अंतर्गत इम्प्लांटमध्ये प्रसारित केले जातात. इम्प्लांटचे इलेक्ट्रोड ॲरे शस्त्रक्रियेने कोक्लियामध्ये घातले जाते. श्रवण तंत्रिका उत्तेजित करते, मेंदूला सिग्नल पाठवते. मेंदू या सिग्नल्सचा ध्वनी म्हणून अर्थ लावतो. ज्यामुळे व्यक्तींना भाषण आणि पर्यावरणीय आवाज समजू शकतात.**

## 'आप'च्या आमदारला अटक

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

आम आदमी पार्टीचे आमदार अमनतुल्ला खान यांना सहा तासांच्या चौकशीनंतर ईडीने अटक केली आहे. दिल्ली वक्फ बोर्डाशी संबंधित मनी लॉंडरिंगप्रकरणी त्यांना अटक करण्यात आली आहे. ईडीचे अधिकारी सोमवारी सकाळी अमनतुल्ला यांच्या ओखला परिसरातील घरी पोहोचले. त्यानंतर त्यांनी अमनतुल्ला यांची सहा तास चौकशी केली. अमनतुल्ला हे दिल्ली वक्फ बोर्डाचे अध्यक्ष असताना त्यांच्या कार्यकाळात घोटाळा केल्याचा आरोप ईडीने केला आहे.

# शेषनाथ कोळी यांचे निधन

## सुप्रिया पाटील यांच्याकडून कोळी कुटुंबियांचे सांत्वन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**



शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ निष्ठावंत कार्यकर्ते शेषनाथ कोळी (५८) यांचे शनिवारी (दि.३१) सायंकाळी अल्पशा आजारामुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा तथा अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील यांनी रविवारी थळमध्ये जाऊन कोळी कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

अलिबाग तालुक्यातील थळमधील उंदेर आळी येथील शेषनाथ कोळी यांनी या परिसरात शेतकरी कामगार पक्षाचा लाल बावटा फडकवत ठेवण्याचे काम केले. पक्षवाढीसाठीदेखील त्यांचे योगदान राहिले आहे. राजकीय क्षेत्रात काम करीत असताना •> पान २ वर








### गणेशोत्सवापूर्वी महामार्ग झटपट करण्याच्या नादात दर्जाहीन काम

# वाकण पुलावर भरलेले खड्डे उखडले

## भरपावसात केलेले डांबरीकरण उखडण्यास सुरुवात



(छायाचित्र : महेश पवार)

**। नागोठणे । वार्ताहर ।**

गणेशोत्सवापूर्वी महामार्ग सुस्थितीत करण्याच्या नादात महामार्गावर काही ठिकाणी निकृष्ट पद्धतीने काम केल्याचे दिसून येत आहे. असाच काहीसा प्रकार वाकण येथील अंबा नदीच्या पुलावर घडला असून, खडी डांबराच्या मिश्रणाने भरलेले पुलावरील खड्डे निकृष्ट दर्जाच्या कामामुळे उखडण्यास सुरुवात झाल्याचे दिसून येत आहे. गणेशोत्सवापूर्वी महामार्ग झटपट सुस्थितीत करण्याच्या नादात दर्जाहीन काम होत असल्याचा आरोप वाहनचालक व प्रवाशांतून करण्यात येत असून, तीव्र नाराज व्यक्त करण्यात येत आहे.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २६ ऑगस्ट रोजी मुंबई गोवा महामार्गाच्या कामाचा आढावा घेत पाहणी दौरा केला. त्यानंतर खडबडून जागे झालेल्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व कल्याण टोल प्लाझा यांच्या यंत्रणेकडून महामार्गाला सुस्थितीत आणण्याचे काम तातडीने सुरू करण्यात आले. मात्र, असे असले तरी महामार्ग कामाचे ठेकेदार कल्याण टोल प्लाझाकडून निकृष्ट दर्जाचे काम करण्यात येत आहे. याचे ताजे उदाहरण म्हणजे, नागोठण्याजवळील वाकण नाका येथील अंबा नदीवर असलेल्या पुलाच्या दोन्ही मार्गिकेवर पडलेले महाकाय खड्डे बुजवण्याचे कामही यंत्रणेकडून सुरू करण्यात आले. मात्र, असे असले तरी मुंबईकडून महाडकडे जाणाऱ्या पुलावरील मार्गीकेवर बुजविण्यात आलेले खड्डे उखडण्यास सुरुवात झाली आहे. या खड्ड्यातील डांबरमिश्रित खडी खड्ड्याबाहेर आल्याने पुलावर पुन्हा खड्डे पडण्यास सुरुवात झाल्याने खड्डे भरण्याच्या कामाचा निकृष्ट दर्जा दिसून येत आहे. तसेच महाडकडून मुंबईकडे जाण्यासाठी असलेल्या पुलाच्या मार्गीकेवर काही ठिकाणी असलेले मोठे खड्डे अद्यापही बुजवण्यात न आल्याने हे काम केव्हा होणार असा प्रश्न उपस्थित होत आहे. पाऊस गेल्या काही दिवसांपूर्वी पूर्णतः थांबलेला असतानाही त्यावेळी काम न करणाऱ्या ठेकेदाराने भरपावसात आता हे काम सुरू केल्यानेच भरलेले खड्डे पुन्हा उखडत असल्याचे दिसून येत आहे.

मुंबई, ठाण्यातील चाकरमानी गणेशोत्सवासाठी दोन-तीन दिवसानंतर कोकणाकडे जाण्यास निघणार असल्याने आणि कोकणाकडे जाणाऱ्या मार्गीकेवरच वाकण येथील पुलावर व इतर काही ठिकाणी भरलेले खड्डे उखडण्यास सुरुवात झाली आहे. तसेच सध्या सुरू असलेल्या संततधार पावसात सुरू असलेल्या कामामुळे महामार्ग सुस्थितीत येईल का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, वाकण पुलावरील व इतर ठिकाणचे खड्डेही तातडीने चांगल्या पद्धतीने भरून महामार्ग सुस्थितीत करण्यात येईल, असे कल्याण टोल प्लाझाच्या यंत्रणेकडून स्पष्ट करण्यात आले.

# अलिबागमध्ये हातमाग कापडाचे प्रदर्शन




**। अलिबाग । वार्ताहर ।**

अलिबागमध्ये सोलापूर येथील भाऊराया हॅण्डलूम यांचे हातमाग व यंत्रमाग कापडाचे प्रदर्शन व विक्री केंद्राचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले आहे. अलिबाग येथे सार्वजनिक वाचनालय डोंगरे हॉल, रायगड जिल्हा परिषदेजवळ, मुख्य पोस्ट ऑफिससमोर हे प्रदर्शन येथे सुरू करण्यात आले आहे.

या प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य दिव्यांग सल्लागार साईनाथ पवार व माजी जिल्हा परिषद अधिकारी सुरेश म्हात्रे व सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल भालचंद्र वर्तक यांच्या हस्ते द्वीप प्रज्ज्वलन करुन करण्यात आले. दि. २५ सप्टेंबरपर्यंत हे प्रदर्शन चालणार आहे. हातमाग विणकाम करून तयार केलेले कापड अत्यंत चांगल्या दर्जाचे असते, त्यामुळे हातमाग कापड प्रदर्शनाचा अलिबागकरांनी लाभ घ्यावा, असे आवाहन हातमाग कापड प्रदर्शनाचे प्रमुख पांडुरंग पोतन यांनी केले आहे.

# रसायनीत आज वीजपुरवठा बंद

**। रसायनी । वार्ताहर ।**

काही दिवसांवर आलेल्या गणेशोत्सवात अखंडित वीजपुरवठा करण्याच्या अनुषंगाने उद्या मंगळवार, दि.०३ सप्टेंबर रोजी २२ केव्ही एचओसी टू आणि रिलायन्स टू फिडरवर वाढलेल्या झाडांच्या फांद्या छाटणे आणि एचटीलाईनवरील इतर कामासाठी १० ते ५ या कालावधीमध्ये मोहोपाडा, नवीन पोसरी, पराडे, दापिवली, खाने आंबिवली, आळी आंबिवली, पोसरी, चांभाली, शिवनगर, रीस, भटवाडी, तळेगाव, पानशिल, दांडफाटा या परिसरातील वीजपुरवठा ट्री कटिंग आणि जंपरिंगसाठी बंद राहील, असे मोहोपाडा महावितरणचे उपअभियंता लक्ष्मीकांत गलांडे यांनी सांगितले.

# झेब्रा पट्ट्यांअभावी गतिरोधकांचा धोका

## अलिबाग-मुरुड रस्त्यावर दुचाकीस्वारांच्या अपघातात वाढ

**। कोर्लई । वार्ताहर ।**

अलिबाग-मुरुड रस्त्यावर पावसाळ्यापूर्वी झालेल्या डांबरीकरणानंतर गतिरोधकांचीदेखील संख्या वाढली असून, बऱ्याच ठिकाणी या गतिरोधकांना पट्टे, झेब्रा पट्टे नसल्याने अपघाताला आमंत्रण देत आहे. विशेष करून दुचाकीस्वारांना याचा त्रास सहन करावा लागत असून, वेळप्रसंगी अपघाताला सामोरे जावे लागत आहे. मात्र, याकडे संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष दिसून येते आहे.

मुरुड तालुक्यातील अलिबाग-मुरुड रस्त्यावर विहूर एसटी स्टँडजवळ असलेल्या गतिरोधकाला सफेद पट्टे नाहीत, त्यामुळे हे स्पीड ब्रेकर दिसत नाहीत. त्यामुळे गतिरोधकावरून दुचाकीस्वार घसरून पडल्याच्या घटनांमध्ये वाढ होऊ लागली आहे. मुरुड-अलिबाग रस्त्यावर पूर्वी जेवढे गतिरोधक होते. त्यात यंदा डांबरीकरणानंतर वाढ झाली असून, बऱ्याच ठिकाणी सफेद पट्टे मारलेले नसल्याने दुचाकीस्वारांच्या अपघातात वाढ झाल्याचे दिसून येत आहे.संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याने तातडीने दखल घेऊन या रस्त्यावरील गतिरोधकांना लवकरात लवकर सफेद झेब्रा पट्टे मारावेत व वाहनचालकांचा दुवा घ्यावा, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

# महाड बसस्थानकात बांधली गुरे



मनसेचे अनोखे आंदोलन

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड बसस्थानकाची झालेली दुरवस्था आणि रखडलेल्या नवीन बस स्थानकाच्या इमारतीमध्ये महाड मनसेतर्फे जनावरे बांधून अनोखे आंदोलन करण्यात आले. बसस्थानकात गुरे बांधा आंदोलन छेडून प्रशासनाचा निषेध करण्यात आला.

महाड एसटी आगाराची गेली अनेक वर्षांपासून दयनीय अवस्था आहे. त्याचप्रमाणे बांधण्यात येणारी नवीन इमारतदेखील गेले काही वर्षांपासून निधीअभावी रखडलेली आहे. जुन्या बसस्थानकातील रस्त्यावर चिखल आणि खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून, त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. त्याचप्रमाणे महिला व पुरुष प्रसाधनगृह गेले कित्येक वर्षे दुर्गंधीयुक्त घाणेरड्या अवस्थेत असल्याने प्रामुख्याने महिला भगिनींची प्रचंड गैरसोय होत आहे. या व इतर अन्य समस्यांवरून मनसेतर्फे हे आंदोलन पुकारण्यात आले होते. यावेळी सरकारचा व एसटी प्रशासनाचा निषेध नोंदवून सर्व बसस्थानकात हे गुरे फिरवून बांधण्यात आली आणि संबंधित अधिकाऱ्यांना फैलावर घेत जाब विचारण्यात आला. महाडसारख्या ऐतिहासिक शहरात असलेल्या या बस आगाराची अशी अवस्था म्हणजे लाजिरवाणी बाब असल्याचे पंकज उमासरे यांनी सांगितले.

यावेळी पक्षातर्फे दक्षिण रायगड उपजिल्हाध्यक्ष चेतन उतेकर, वाहतूक सेना राज्य उपाध्यक्ष फैसल पोपेरे, रस्ते आस्थापना जिल्हा सचिव शेखर सावंत, माणगाव तालुकाध्यक्ष चेमण सुखदरे, महाड उपतालुका अध्यक्ष स्वप्निल वडके, महाड शहर अध्यक्ष पंकज उमासरे, रस्ते-आस्थापना तालुका संघटक महाड सागर भोसले, विद्यार्थी सेना तालुका अध्यक्ष अथर्व देशमुख, भरत गंगथडे, महिला आघाडी शहर अध्यक्ष प्रतीक्षा कुलकर्णी आदी पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.



# प्रामाणिकपणे सेवा दिल्याचा मला अभिमान : ठाकूर

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण येथील मंडळ अधिकारी सुरेंद्र मधुकर ठाकूर यांच्या सेवानिवृत्तीचा कार्यक्रम नुकतापच पार पडला. यावेळी आपल्या मनोगतात सुरेंद्र ठाकूर यांनी सांगितले की, तब्बल १७ वर्षे मी प्रामाणिक देशसेवा केली. त्यानंतर काही काळ खासगी कंपन्यांमध्ये काम करण्याचा प्रयत्न केला. ज्यावेळी मी महसूल खात्यामध्ये तलाठी म्हणून रुजू झालो, त्यावेळेला मी मनात एक खूणगाठ बांधली होती की, देशसेवा करताना जेवढा प्रामाणिक वागलो, तेवढाच प्रामाणिक मी महसूल कार्यालयामध्ये काम करताना राहीन. माझ्या कामात कधीच दिरंगाई होणार नाही अथवा माझ्यामुळे कुणाला त्रास होणार नाही, याची पूर्ण खबरदारी घेतली जाईल. हे मी ठरवले आणि आज शेवटच्या दिवशी पण माझ्या कामात मी कुठेही थोडीही कचुराई केली नाही, याचा मला सार्थ अभिमान आहे. यावेळी नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, मा. गटविकास अधिकारी प्रसाद म्हात्रे, नगरसेवक तथा पत्रकार संतोष पाटील, तलाठी अनिल म्हात्रे यांच्यासह सुरेंद्र ठाकूर यांच्या मोठ्या बंधूंनीदेखील आपले मनोगत व्यक्त करून कडू-गोड अनुभव शेअर केले.

# श्रीवर्धन समुद्रकिनारा बनला विद्रुप

**श्रीवर्धन :** येथील समुद्र किनाऱ्यावर गेले चार दिवस टार बॉल्स व दलदलसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने किनारा विद्रूप झाला आहे. श्रीवर्धन नगरपरिषदेकडून नागरिक व पर्यटकांना किनाऱ्यावर न जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. श्रीवर्धन येथील तीन किलोमीटर लांबीच्या समुद्र किनाऱ्यावर चार दिवसांपासून दलदलसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. दलदलीपाठोपाठ समुद्राच्या लाटांबरोबर किनाऱ्यावर टार बॉल्स (काळ्या रंगाचे चिकट गोळे) पसरल्याचे दिसण्यात येते. अनवधानाने किनाऱ्यावर फिरावयास गेलेल्या नागरिक व पर्यटकांना दलदलीबरोबरच टार बॉल्सना सामोरे जावे लागले. चिकट गोळे अनेकांच्या पायाला लागल्याने पाय लालसर होऊन थोड्या फार वेदना झाल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पान १ वरून

## रायगडला डेंग्यूचा ‘ताप’

भागातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा प्रयत्न जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत केला जातो. जिल्ह्यात एक जिल्हा सामान्य रुग्णालय, सहा उपजिल्हा रुग्णालय व आठ ग्रामीण रुग्णालये आहेत. या संस्थाच्या मदतीने शहरी ग्रामीण भागात आरोग्य सुविधा देण्याचा प्रयत्न होत असतानादेखील जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसांपासून डेंग्यूने थैमान घातले आहे. अलिबाग, पनवेल, पेण आदी तालुक्यांतील नागरिकांना डेंग्यूची लागण मोठ्या प्रमाणात आहे. दरदिवशी १५ ते ३५ रुग्ण सापडत आहेत. रुग्णांची संख्या दरदिवशी वाढत असल्याने जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणांची धावपळ उडाली आहे. जुलै महिन्यात १४४, तर ऑगस्ट महिन्यात १३८ रुग्ण सापडले आहेत. यातील काही रुग्ण बरे झाले असून, काही रुग्ण वेगवेगळ्या रुग्णालयात उपचार घेत असल्याची माहिती समोर येत आहे. अलिबाग व रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात सापडलेले पाच रुग्ण उत्तर प्रदेशातील असल्याची माहिती देण्यात आली आहे.

**दर बुधवारी पाळणार कोरडा दिवस**

रायगड जिल्ह्यात डेंग्यूचे रुग्ण सापडत आहेत. डासांची उत्पत्ती वाढू नये यासाठी हिवताप कार्यालयाने कंबर कसली आहे. फवारणीसह औषधोपचार केले जात आहेत. बैठकांच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. मागील दोन वर्षांच्या तुलनेने यावर्षी डेंग्यूचे रुग्ण अधिक सापडत आहेत. त्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. परंतु, त्यावर वरच्या पातळीवर तपासणी सुरु आहे. डेंग्यूला रोखण्यासाठी दर बुधवारी जिल्ह्यात कोरडा दिवस पाळण्याच्या सूचना केल्या असल्याची माहिती जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. राजाराम भोसले यांनी दिली.

## ग्रामीण रुग्णालयाला अद्याप टाळेच

बंद ठेवण्यात आले. मधल्या काळात महाआघाडीचे सरकार काही दिवसात गेले आणि नव्याने शिंदे-फडणवीस यांचे सरकार आले. या सरकारमध्ये श्रीवर्धन मतदारसंघातील आमदार अदिती तटकरे यांना पुन्हा मंत्रीपदाची संधी मिळाली, त्यामुळे येथील जनतेच्या रुग्णालयाच्या बाबतीत पुन्हा अशा पल्लवित झाल्या; परंतु एकमेव महिला मंत्र्यांकडूनदेखील भ्रमनिरास झाला आहे. त्यामुळे सत्ताधारी आणि प्रशासनाच्या भोंगळ कारभाराचा निषेध करण्यासाठी तळा तालुक्यातील विकास आघाडीतर्फे अनोखे श्राद्ध आंदोलन बुधवार, दि.४ सप्टेंबर रोजी दुपारी तीन वाजता करण्यात येणार आहे. हा अंधश्रद्धेचा भाग नसून, पारंपरिक पद्धतीने वर्षश्राद्ध करण्याचे योजले आहे, असे सांगण्यात आले.

रुग्णालयाच्या आत्म्यास शांती लाभून रुग्णालय लवकरात लवकर सुरू करण्यासाठीचा प्रयत्न आहे, जेणेकरून तालुक्यातील रुग्णांना वेळेवर उपचार मिळतील. हे श्राद्ध उद्घाटन करून बंद असलेले ग्रामीण रुग्णालय ते नजरेस पडेल इतक्या अंतरावर पार पडणार आहे.तळा शहरात सत्ताधाऱ्यांची मनमानी असून, नागरिकांचे हित लक्षात न घेता केवळ टेंडरसाठी कामे केली जात असल्याचा आरोप होत असताना, या श्राद्ध आंदोलनाने सत्ताधारी आणि प्रशासन जागे होते का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून आहे.

## जि.प.ने सारांशला दिली श्रवणशक्ती

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले. यावेळी डॉ. भरत बास्टेवाड यांनी सारांशला उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. रायगड जिल्हा परिषदेने आर्थिक मदत केल्यामुळे सारांशला आता ऐकू येत आहे. त्यांचे सर्वांचे आभार मानतो, असे सारांक्षच्या आई-वडिलांनी सांगितले.

मेढेखार येथील सारांश प्रशांत ठाकूर हा बालक जन्मतः मूकबधीर आहे. घरची परिस्थिती बेताची असल्याने सारांशच्या पालकांनी त्याच्यावर कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेसाठी जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडे अर्ज केला. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, समाजकल्याण अधिकारी डॉ. शामराव कदम, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम यांनी तात्काळ हालचाल करीत जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून निधी मंजूर करीत, शस्त्रक्रियेसाठी आवश्यक ६ लाख ८ हजार रुपयांचा निधी रुग्णालय प्रशासनाकडे वर्ग केला.

अतिशय नाजूक समजल्या जाणाऱ्या कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेद्वारे कानाच्या मागील हाडामध्ये एक यंत्र बसविले जाते. त्याद्वारे बाहेरील ध्वनिलहरीचे इलेक्ट्रिक ध्वनिलहरीत रूपांतर होऊन जन्मजात कर्णबधिर बालकाला ऐकू येण्यास चालना मिळते, सारांशवर नुकतीच ही यशस्वीरित्या शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

**सारांश ठाकूर या मूकबधिर बालकावर कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आली आहे. पाच वर्ष आतील बालकांवर कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया अधिक प्रभावी ठरत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ५ वर्षांच्या आतील मूकबधिर बालकांच्या पालकांनी जिल्हा परिषदेकडे वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाने संपर्क साधावा. पात्र बालकावर कॉक्लियर इम्प्लांट शात्रक्रिया करण्यासाठी आवश्यक ते आर्थिक सहकार्य जिल्हा परिषदेच्या माध्यम ातून करण्यात येईल.**

**- डॉ. भरत बास्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रायगड**

## विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

गळफास घेऊन आत्महत्या केली. तिला उपचाराकरिता माणगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात आणले असता येथील डॉक्टरांनी तिला तपासून मयत झाल्याचे सांगितले. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू म्हणून करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गायकवाड करीत आहेत.

## लालबागमध्ये गर्दीत घुसली बेस्टची बस

पळापळ झाली. यामध्ये आठ जण जखमी झाले असून, दोघांची प्रकृती गंभीर आहे. चालकाने वेळीच नियंत्रण मिळवल्याने मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच काळाचौकी पोलीस घटनास्थळी पोहोचले. जखमींना जवळच्या रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दारूडा प्रवासी दत्ता शिंदे याला ताब्यात घेण्यात आले असून, पुढील कायदेशीर कारवाई केली जात असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.

## शेषनाथ कोळी यांचे निधन

रायगड जिल्हा मच्छिमार संघाचे जिल्हा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघाचे संचालक, अलिबाग अर्बन बँकेचे संचालक अशी अनेक पदे त्यांनी भूषविली आहेत. मच्छिमारांचे प्रश्न शासन दरबारी मांडून ते सोडविण्याचाही प्रयत्न त्यांनी केला. पनवेलमधील रुग्णालयात त्यांच्या आजारपणावर उपचार सुरु होते.

शनिवारी सायंकाळी त्यांचे अल्पशा आजारामुळे निधन झाले. थळमधील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, सहकार अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळी, कार्यकर्ते, नातेवाईक, ग्रामस्थांनी उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

**जाहिर नोटीस**

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे खंडाळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. आशीष अशोककुमार भगत यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| खंडाळे ता. अलिबाग जि. रायगड | १५४ | क्षेत्र ०-०३-८० पो.ख.००-०२-८० एकूण ००-०६-६० | ०.१९ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : ३/०९/२०२४

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

# प्रा. सुरदास राऊत सेवानिवृत्त

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे प्राचार्य सुरदास राऊत हे ३४ वर्षांची प्रदीर्घ सेवा बजावत नियत वयोमानानुसार ३१ ऑगस्ट रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. चिरनेर येथील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष पांडुरंग खारपाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या सेवापूर्ती व सन्मान सोहळा कार्यक्रमात प्रा. राऊत यांना निरोप देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

सुरदास राऊत यांनी शिक्षकी जीवनात महाड येथील वि.ह. परांजपे विद्या मंदिरापासून अध्यापनाची सुरुवात केली. त्यानंतर जनरल अरुण कुमार वैद्य अलिबाग, न्यू इंग्लिश स्कूल मोरा, थरवळ हायस्कूल महाड व सेकंडरी स्कूल चिरनेर म्हणजेच पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटी या शाळांमध्ये त्यांनी शिक्षकी सेवा उत्तम बजावली. याप्रसंगी उपस्थितांपैकी अनेकांनी आपल्या मनोगतात राऊत यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले. दरम्यान, प्रा. सुरदास राऊत आणि त्यांच्या सहचारणी भारती राऊत यांचा दीर्घ सेवेबद्दल सन्मानपत्र आणि भेटवस्तू देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला.

**ग्रुप ग्रामपंचायत देगाव**
**ता. माणगाव, जि. रायगड**
**निविदा सूचना**

ग्रुप ग्रामपंचायत देगाव खालील कामाकरिता जास्तीत जास्त नोंदणीकृत, इच्छित ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निंविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव/वस्तूचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | निविदा सादर करणेचा: अंतिम तारीख | निविदा सादर करणेचा: वेळ | निविदा सादर करणेचा: ठिकाण | १९% इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | देगाव येथे ट्रायसायकल पुरविणे | ३६०००/- | ३ महिने | १०/०९/२०२४ | स.१०.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ३६०/- | २००/- |
| २ | ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाड्यांना फर्निचर खरेदी करणे | ६००००/- | ३ महिने | १०/०९/२०२४ | स.१०.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ६००/- | २००/- |
| ३ | ग्रामपंचायत हद्दीतील शाळांना फर्निचर खरेदी करणे | ६००००/- | ३ महिने | १०/०९/२०२४ | स.१०.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ६००/- | २००/- |
| ४ | ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाड्यांना डिजिटल वजनकाटे पुरविणे | १४१२८/- | ३ महिने | १०/०९/२०२४ | स.१०.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | १४१/- | २००/- |

**अटी व शर्ती**
१)प्राप्त निविदा दि. १३/०९/२०२४ रोजी स. ठीक १०.०० वाजता ग्रा. पं. देगाव येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उपडणेत येईल.
२)कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच देगाव यांनी राखून ठेवला आहे.
३)प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रकमा कपात केल्या जातील. मा. उपअभियंता सो. बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स. माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं.चे पदाधिकारी सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्र.पं.ने राखून ठेवला आहे.
४)काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांच्या निविदांचा विचार केला जाईल.

सही/-
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत देगांव
ता. माणगांव, जि. रायगड

सही/-
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत देगांव
ता. माणगांव, जि. रायगड

**ग्रुप ग्रामपंचायत देगाव**
**ता. माणगाव, जि रायगड**
**निविदा सूचना**

ग्रुप ग्रामपंचायत देगाव खालील कामाकरिता जास्तीत जास्त नोंदणीकृत, इच्छित ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव / वस्तूचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | निविदा सादर करणेचा: अंतिम तारीख | निविदा सादर करणेचा: वेळ | निविदा सादर करणेचा: ठिकाण | ११% इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे पाचोळे येथे ४ सीटचे सार्वजनिक शौचालय बांधणे | ३.०० लक्ष | ३ महिने | १०/०९/२०२४ | स.१०.०० वा पर्यंत | ग्रा. पं. कार्यालय | ३०००/- | २००/- |
| २ | मौजे देगाव आ. वाडी येथे ४ सीटचे सार्वजनिक शौचालय बांधणे | ३.०० लक्ष | ३ महिने | १०/०९/२०२४ | स.१०.०० वा पर्यंत | ग्रा. पं. कार्यालय | ३०००/- | २००/- |
| ३ | देगाव अंतर्गत रस्ता करणे. | ११५४६०/- | ३ महिने | १०/०९/२०२४ | स.१०.०० वा पर्यंत | ग्रा. पं. कार्यालय | ११५४/- | २००/- |
| ४ | रिळे येथे अंतर्गत उताराच्या रस्त्याला पायऱ्या बांधणे | १.०० लक्ष | ३ महिने | १०/०९/२०२४ | स.१०.०० वा पर्यंत | ग्रा. पं. कार्यालय | १०००/- | २००/- |
| ५ | निळगुण अंगणवाडीला ग्रिल बसविणे | २५६५०/- | ३ महिने | १०/०९/२०२४ | स.१०.०० वा पर्यंत | ग्रा. पं. कार्यालय | २५६/- | २००/- |
| ६ | रिळे येथे व्यायामशाळा बांधणे | ५.६० लक्ष | ३ महिने | १०/०९/२०२४ | स.१०.०० वा पर्यंत | ग्रा. पं. कार्यालय | ५६००/- | २००/- |
| ७ | देगाव बी. बाडी स्मशान चौथरा बांधणे. | १.०० लक्ष | ३ महिने | १०/०९/२०२४ | स.१०.०० वा पर्यंत | ग्रा. पं. कार्यालय | १०००/- | २००/- |

**अटी व शर्ती**
१) प्राप्त निविदा दि. १३/०९/२०२४ रोजी स. ठीक १०.०० वाजता ग्रा. पं. देगाव येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडणेत येईल.
२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच देगाव यांनी राखून ठेवला आहे.
३) प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रकमा कपात केल्या जातील. मा. उपअभियंता सो. बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स. माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं.चे पदाधिकारी/सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून, काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवला आहे.
४) काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्या नंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांच्या निविदांचा विचार केला जाईल.

सही/-
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत देगांव
ता. माणगांव, जि. रायगड

सही/-
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत देगांव
ता. माणगांव, जि. रायगड

**निवडक**

## मारुती जाधव यांचे निधन

**कोलाड :** गोवे येथील मारुती धोंडू जाधव यांचे बुधवारी (दि. २८) निधन झाले. ते अतिशय प्रेमळ व कष्टाळू स्वभावाने सर्वांना परिचित होते. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी त्यांचे नातेवाईक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, क्षेत्रातील मान्यवरासहित समस्थ गोवे ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी एक मुलगा, दोन मुली, सुन, बहीण, भाऊ, नातवंडे, जावई व जाधव परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी व उत्तरकार्य विधी शुक्रवारी (दि.६) त्यांच्या निवास्थानी होतील.

## महारोजगार मेळाव्यास प्रतिसाद

**नवी मुंबई :** नेरुळ येथील आगरी कोळी भवनमध्ये आयोजित केलेल्या भव्य रोजगार मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या मेळाव्यास २१०८ उमेदवारानी नोंदणी केली होती. त्यातील ११९६ उमेदवारांना तात्काळ नोकरीची संधी प्राप्त झाली. भव्य रोजगार मेळाव्यात बीपीओ, केपीओ, आयटी, फॅसिलिटी मॅनेजमेंट, सिक्युरिटी, उत्पादन, ट्युटोरियल्स, इंजिनिअरिंग, एअरपोर्ट, मॅनेजमेंट, नर्सिंग आदी कंपन्यामध्ये हजारो नोकरी उपलब्ध करून देण्यात आली.

## अजगराला दिले जीवदान

**सोगाव :** सोगाव आदिवासी वाडीजवळ भला मोठा अजगर आला होता. याबाबत परिसरातील सर्पमित्रांना माहिती देत त्यांना घटनास्थळी पाचारण केले. यावेळी झिराड येथील सर्पमित्र रुपेश गुरव, किहीम येथील सर्पमित्र तुषार चव्हाण, भाल येथील सर्पमित्र नीरज दळवी या सर्पमित्रांनी मोठ्या शिताफीने तब्बल ७ फूट लांब व अंदाजे १५ किलोपेक्षा जास्त वजनाच्या अजगराला पकडून नैसर्गिक अधिवासात सोडण्यासाठी घेऊन गेले. अजगराला पाहण्यासाठी परिसरातील लहानांसह मोठ्यांनी गर्दी केली होती.

## पाठलाग केल्याप्रकरणी गुन्हा

**नवीन पनवेल :** अल्पवयीन मुलीचा पाठलाग केल्याप्रकरणी आरोपी महेश लोखंडे यांच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीला अटक करण्यात आली आहे. त्याला न्यायालयात हजर केले असता २ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. महेश लोखंडे याला नागरिकांच्या मदतीने शोधण्यात आले व त्याला मारहाण करण्यात आली. या प्रकरणी पाच ते सहा अनोळखी इसमाविरोधात शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## तरुणीचा केला विनयभंग

**नवीन पनवेल :** भाताण येथील अमेठी युनिव्हर्सिटी मध्ये शिक्षण घेत असलेल्या २१ वर्षीय तरुणीचा विनयभंग केल्याप्रकरणी कार्तिकेय याच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.पीडित तरुणी सेमिनार हॉलमध्ये खुर्चीवर बसलेले होती. तिच्या मागे बसलेला कार्तिकेय याने तिचा विनयभंग केला. या प्रकरणी पीडित तरुणी तिच्या वडिलांसह पनवेल तालुका पोलीस ठाण्यात आल्यानंतर आरोपी कार्तिकेय याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# यांत्रिकीकरणाच्या युगात रायगडात बैलजोडीला पसंती

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

पोळा किंवा बैलपोळा हा श्रावण अमावस्या किंवा भाद्रपद अमावास्या किंवा श्रावण अमावास्या या तिथीला प्रदेशानुसार साजरा करण्यात येणारा बैलांचा सण आहे. बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा एक मराठी सण असून हा विशेषतः विदर्भात भव्य पातळीवर साजरा केला जातो. जिल्ह्यात देखील काही शेतकरी या सणाला विशेष महत्त्व देतात. बैलांना गोडधोड खाऊ देतात. व सजवतात देखील करतात. शर्यतीच्या बैलांचादेखील येथे वेगळा थाट आहे



यांत्रिकीकरणाच्या युगातही पाली सुधागड सह जिल्ह्यात अनेक शेतकरी अजुनही शेतीच्या मशागतीसाठी बैलांचा नांगराला पसंती देत आहेत. भात शेती तुकड्यामध्ये विभागली आहे. डोंगर उताराला लागून असलेली व दुर्गम आणि दुर्च्या पल्ल्यातील शेती, शेताभोवती असलेले बांध यामुळे तेथे ट्रॅक्टर नेणे व नांगरणी करणे गैरसोयीचे होते. मात्र नांगर व बैल कुठेही सहज नेले जाऊ शकतात. बैल नांगराचा फाळ जमिनीत खोलवर जावून जमीन अधिक भुसभूशीत करतो. त्यामूळे पेरणी करणे सोप्पे जाते. शेतात बैलाचे पाय पडणे हे अनेकांना शुभ वाटते.

### माल वाहतुकीसाठी वापर

जिल्ह्यातील काही गावात अजुनही धान्य, पेंढा किंवा शेतीला लागणारे समान ने-आण करण्यासाठी बैलगाडी वापरली जाते. विज्ञान व तंत्रज्ञानाने शेतकऱ्यांना सुखाचे दिवस दाखवले आहेत. अजुनही शेतीसाठी, धान्य किंवा समान ने-आण करण्यासाठी तसेच विविध कामांसाठी बैलगाडीचा वापर करताना दिसत आहे.

### शर्यतीच्या बैलांचा थाट

जिल्ह्यात पनवेल, उरण, अलिबाग, कर्जत या ठिकाणी बैलगाडा शर्यती जोमात होतात. तसेच बैलगाडा शर्यतीचे शर्यतप्रेमी जिल्ह्यात सर्वत्रच आहेत. पनवेल, उरण, कर्जत या ठिकाणी बिनजोड शर्यती खुल्या मैदानात होतात. तर अलिबागमध्ये समुद्राच्या वाळूवर शर्यती होतात. शर्यत बघण्यासाठी हजारो लोक जमतात. विशेष म्हणजे महाराष्ट्रात कुठेही बैल पळवला तरी रायगड जिल्ह्यात व नवी मुंबईत बैल पाळल्यानंतरच त्याची खरी किंमत किंवा प्रतिष्ठा ठरते. त्यामुळे येथील शर्यतींना संपूर्ण महाराष्ट्रात महत्व आहे. या बैलांचा खुराक व थाट काही औरच असतो. त्यांची अगदी घरातील माणसाप्रमाणे बडदास्त राखली जाते असे पनवेलजवळील ओवळे येथील शर्यतप्रेमी व बैलवाले रुपेश मुंगाजी यांनी सांगितले.

# मढाळी बु.येथे विद्यार्थी सुरक्षा जनजागृती

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील प्राथ.शाळा मढाळी बु. येथे विद्यार्थी सुरक्षा जनजागृती व आरोग्य शिबीर मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले. कोलाड पोलीस स्टेशन येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन मोहिते यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्यक्रमप्रसंगी खांब डीएचओ आम्रपाली भालेराव, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सुरेखा कोळी, उपाध्यक्षा पिंकी पवार, माजी अध्यक्ष विकास कोळी तसेच सर्व पालक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवराय यांच्या प्रतिमेचे पूजनाने झाली.यावेळी नितीन मोहिते यांनी विद्यार्थ्यांना आजकाल घडत असलेल्या घटनेला सामोरे कसे जायचे, त्याअगोदर आपला स्वतचे संरक्षण कसे करायचे याबाबत मार्गदर्शन करताना बालविवाह करू नये केल्यास कायद्यानुसार काय शिक्षा होते याची माहिती दिली. त्याच बरोबर दारूबंदी व इतर सर्व बाबींचे सखोल मार्गदर्शन केले. त्यांनतर विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी स्वच्छता महत्वाची आहे याबाबत आम्रपाली भालेराव यांनी मार्गदर्शन केले. आरोग्य तपासणी करून विविध आजारावरच्या औषध गोळ्याचे वाटप केले.

# चोंढी विभागाचे वृक्षारोपण

**। अलिबाग । प्रतिनिधी।**

सकल मराठा समाज चोंढी विभागाकडून गणपती घाट चोंढी आणि दत्त मंदिर साईनगरयेथे वृक्षारोपणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सकल मराठा समाज तालुका अध्यक्ष नरेश सावंत, चोंढी विभागीय अध्यक्ष जितेंद्र जरंडे, चोंढी, किहीम, बामणसुरे, बोंबटकर पाडा, कातळपाडा, सातिर्जे, झिराड पाडा, आवास, सासवने, धोकवडे भागातील बहुसंख्येने मराठा बांधव उपस्थित होते.



सकल मराठा समाज चोंढी विभाग तालुक्यात अतिशय सक्रिय असून या विभागामार्फत विविध उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येते. या उपक्रमाचा एक भाग म्हणून गणपती घाट चोंढी आणि दत्त मंदिर साईनगर येथे वृक्षारोपण करण्यात आले. हे वृक्षारोपण तालुका सदस्या विणा जाधव, किहीम सदस्या व मराठा गाव सदस्या जागृती जरंडे, गाव सदस्या कृतिका किसन गायकवाड, गाव सदस्या सारिका आमले, उपस्थित महिला भगिनी व ज्येष्ठ नागरिक यांच्या हस्ते झाले.

# जिल्ह्यात ‘स्वच्छ माझे अंगण’ अभियान सुरू

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

नागरिकांना स्वच्छतेच्या बाबींची सवय अंगीकृत करण्याच्या दृष्टीने स्वच्छ माझे अंगण अभियान राबविण्यात येत आहे. १ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर दरम्यान हे अभियान राबविण्यात येणार असून, त्यात स्वच्छतेबाबत कुटुंब स्तरावर सर्व बाबींचे शास्त्रशुद्ध पद्धतीने व्यवस्थापन करणाऱ्या कुटुंबांचा ग्रामपंचायतीकडून गौरव करण्यात येणार आहे. या अभियानाची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे आवाहन, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले आहे.

स्वच्छ माझे अंगण १ सप्टेंबरपासून सुरू करण्यात आले आहे. या अभियानाची अंमलबजावणी करताना स्वच्छ भारत मिशन टप्पा २ अंतर्गत वैयक्तिक शौचालय, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन राबवीत असलेल्या राज्यातील सर्व कुटुंबस्तरावर या बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊन नित्य-नियमाने स्वच्छतेच्या बाबींची सवय अंगीकृत करण्यासाठी जे कुटुंब वैयक्तिक शौचालय, सांडपाणी व्यवस्थापनकरिता शोषखड्डा, परसबाग, पाझरखड्डा, घनकचरा व्यवस्थापनाकरिता कंपोस्ट खतखड्डा अथवा घरगुती खतखड्डा आणि कुटुंबस्तरावर कचराकुंड्या याबाबतची उपलब्धता करून घेतली असून, त्यांचा नियमितपणे वापर करतात. अशा कुटुंबांना प्रोत्साहन देणे आणि त्यांचे अनुकरण करण्यासाठी इतर ग्रामस्थांना, कुटुंबधारकांना त्यांच्या प्रमाणेच वैयक्तिक स्वरुपाच्या स्वच्छतेच्या सुविधा आपल्या घरात किंवा परिसरात उपलब्ध करून घेण्यासाठी उद्युक्त करणे या बाबींवर भर देण्यात येणार आहे.

# गणेशोत्सवासाठी तळा बाजारपेठ सजली

**। तळा । वार्ताहर ।**

लाडक्या बाप्पाचं आगमन यंदा लवकरच असल्याने गणेशोत्सवात लागणाऱ्या विविध साहित्यांनी तळा बाजारपेठ सजली आहे. गणेशोत्सवासाठी अवघे पाच दिवस शिल्लक राहिले असल्याने रोजगारासाठी शहराकडे स्थलांतरित झालेले चाकरमानी आपल्या गावी परतू लागले आहेत. चाकरमानी चार दिवस आधीच गावी येऊन गावातील घराची साफसफाई करून घरामध्ये गणेशोत्सवासाठी लागणारे साहित्य भरून ठेवतात.

तळा हे तालुक्याचं ठिकाण असल्याने आजूबाजूला वसलेले खेड्यातील अनेक नागरिक खरेदीसाठी शहरात येत असतात. तसेच फळे, पालेभाज्या इतर जीवनावश्यक वस्तू माफक दरात मिळत असल्याने खरेदीसाठी नागरिकांनी गर्दी केली आहे. गणरायाच्या पूजेसाठी लागणारे धुप, कापुर, अगरबत्ती, गळ्यातील कंठीहार, सजावटीसाठी लागणारे कृत्रिम फुलांच्या माळा तसेच विविध साहित्यांनी तळा बाजारपेठ सजली आहे. यावर्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अनुदान महिलांच्या खात्यात जमा झाल्याने बाजारात खरेदीसाठी लगबग पाहायला मिळत आहे.







# बघता काय, सामील व्हा

डाव्यांच्या मोर्चातली ही एकेकाळची लोकप्रिय घोषणा होती. निव्वळ बघे म्हणून राहू नका, आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी व्हा असे आवाहन करणारी व आव्हान देणारी ही घोषणा होती. पण शिंदे सरकारने तिला वेगळाच अर्थ दिला आहे. राज्यातील बहुसंख्य जनतेला आपल्या भ्रष्टाचारात सामील करून घेण्याचा एक मोठा प्रकल्प सध्या राबवला जात आहे. त्याचे नाव लाडकी बहीण योजना. नियमाप्रमाणे काटेकोररीत्या पाहायला गेल्यास वार्षिक अडीच लाख रुपये उत्पन्न असलेल्या कुटुंबातील महिलांनाच ही योजना लागू आहे. गरिबांसाठी ही योजना निश्‍चितच फायदेशीर आहे. पण तीत्यांच्यापुरतीचराहिलेली नाही. खुद्द अजित पवार यांनी याची कबुली दिली आहे. परवा पुण्यात त्यांनी स्वतःच आपला अनुभव सांगितला. योजनेच्या कार्यक्रमात राखी बांधायला आलेल्या महिलांच्या शेतीची चौकशी दादांनी केली. तेव्हा त्या म्हणाल्या की, यंदा पाच-सहाशे टन ऊस कारखान्याला घातला. याचा अर्थ त्यांच्या कुटुंबाचे उत्पन्न काही लाखांमध्ये असावे. त्यावर मी कपाळाला हात लावला असे दादांनी जाहीरपणे सांगितले. द्राक्ष पट्ट्यातल्या बागायतदारांच्या कुटुंबातील महिलांनीही या योजनेचा फायदा घेतल्याचे दिसले. योजनेचे निकष तोडून सर्व थरातल्या महिला या योजनेचा मनमुराद फायदा घेताना दिसत आहेत. हा एक मोठा सामूहिक भ्रष्टाचार आहे. बहुसंख्य याचे लाभार्थी आहेत. जे यात नाहीत ते ‘मिळतायत तर मिळू देत पैसे’, असे म्हणून गप्प आहेत. सरकारला आणि विरोधकांनीही हे ठाऊक आहे. पण ते यावर बोलण्याची शक्यता नाही. कारण, या सर्वांना मते हवी आहेत. दादा स्पष्टवक्ते असल्याने त्यांनी निदान जाहीर कबुली दिली. शिंदे व फडणवीस तेही करण्याची शक्यता नाही. पत्रकार वा विरोधक यापैकी कोणी असा आरोप केलाच तर हे दोघे त्यांना देशद्रोही ठरवतील. बदलापूर अत्याचार आणि मालवण पुतळा या गंभीर घटनांबाबत टीका करण्याला हे विरोधकांचे राजकारण आहे असा बेशरम कांगावा करणारे नेते वेगळे काय करणार?

## दर महिन्याला भ्रष्टाचाराची गोळी

या योजनेचे निकष जाणीवपूर्वक सैल ठेवण्यात आले आहेत. पिवळे किंवा केशरी कार्ड असणे हे आपल्याकडे अगदीच सोपी गोष्ट आहे. कुटुंबातली मुले, माणसे, बायका नोकरी-व्यवसाय करू लागल्या वा त्यांचे उत्पन्न कितीही वाढले तरी ते रेशनकार्डावर दाखवले जात नाही. एकदा कार्ड मिळाले की नंतर उत्पन्नाची कोणीही तपासणी करीत नाही. किंबहुना, मुळात ते देतानाही त्याची फारशी काटेकोर तपासणी होतच नाही. ग्रामीण भागात सर्वांनी एकमेकांना सांभाळून घेण्याचा तर शहरांमध्ये हा भ्रष्टाचाराचा मामला असतो. त्यामुळे या योजनेत गैरव्यवहार होणार हे सर्वांनाच ठाऊक असणार. तरीही ती पुढे रेटली जात आहे, कारण यात सरकारचा एक हेतू आहे. या भ्रष्टाचारातलोकसंख्येतल्या एका मोठ्या वर्गाला सामील करूनघेतले की आपोआप जनतेचे तोंड बांधले जाते. त्यातही योजनेच्या लाभार्थी महिला आहेत. महिला या एकूणच पैशांच्या व्यवहारांपासून आणि म्हणून भ्रष्टाचारापासून दूर असतात असा एक समज आहे. त्यांना इतक्या मोठ्या प्रमाणात यात सहभागी केले की मग सरकार मालवणच्या पुतळ्यात पैसे खावो की, मुंबई-गोवाच्या कंत्राटांमध्ये भानगडी करो. महिला आणि इतर जनता काहीही बोलू शकत नाही. आज नेमके तेच घडते आहे. सरकारी योजनांमध्ये आपल्याकडे पूर्वापार भ्रष्टाचार होत आलेला आहे. पण इतक्या थोड्या काळात इतक्या प्रचंड लोकसंख्येला या सामूहिक भ्रष्टाचारात सामील करून घेण्याचा हा नवाच प्रयोग म्हणायला हवा. शिवाय, आवास योजनेतला भ्रष्टाचार हा एकदाच होतो. वृद्ध वा निराधार पेन्शन योजनेतला भ्रष्टाचारही तसा मर्यादित असतो. नाही म्हटले तरी त्यात बर्‍याच तपासण्या होतात. लाडकी बहीण योजनेत मात्र अगदीच सुलभपणे दर महिन्याला हजारो महिला पात्र नसूनही पैसे उचलणार आहेत. त्यांनाजणू भ्रष्टाचाराची सवय करून घेण्यासाठी दर महिन्याला ही गोळी दिली जाणार आहे. तथाकथितउच्चवर्णीयांपासून ते दलित अशा सर्व महिला यात सहभागी झालेल्या आहेत व होणार आहेत.

## हजार घ्या आणि गप्प रहा

शिंदे सरकारने गेल्या अडीच वर्षात ठोस काहीही काम केलेले नाही. गुरेहाकून नेतात तसे मोदींनी महाराष्ट्रातल्या उद्योगांना गुजरातेतहाकून नेले.शेतकर्‍यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. आरक्षण प्रश्नाचा विचका झाला आहे. त्यात पुन्हा मते मिळवण्यासाठी हिंदू विरुध्द मुस्लिम असे वाद पेटवण्याचे सतत प्रयत्न चालू आहेत. पोलिस यंत्रणा विरोधकांचेफोन ऐकण्यासाठी किंवा त्यांच्यावर खोटे आरोप दाखल करण्यासाठी वापरली जात आहे.पोलिसांच्या बेपर्वाईमुळे व भ्रष्टाचारामुळेच बदलापूर अत्याचार प्रकरण चिघळले. पण गृहमंत्रीफडणवीस यांनी आजतागायत याबाबत माफी मागितलेली नाही. त्यामुळे लोकांमध्ये अस्वस्थता आहे. या सर्वांवर उपाय म्हणून शिंदे सरकारने ही पैसे-वाटप योजना आणली आहे. तिजोरी खाली करण्याचा राज्यावर काय परिणाम होईल याचा विचार करण्याच्या स्थितीत ते नाहीत. काहीही करून येती विधानसभा निवडणुका जिंकणे इतकेच त्यांचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी, पैसे वाटायचे आणि ते करताना जनतेलाही आपल्या पापात सामील करून घ्यायचा हा मार्गअवलंबण्यात आला आहे. शिवसेनेतून फुटताना शिंदे आणि मंडळी खोके घेऊन ओके झाली असे म्हणतात. नंतर मंत्रिपद मिळाले नाही म्हणून भरतशेठगोगावलेयांच्यासारखे अनेक आमदार नाराज होते. पण नंतर शेकडो कोटींचा निधी मिळाल्याने हे सर्वजण गप्प झाले. अशाच रीतीने राज्यातल्या तमाम महिलांच्या तोंडावर महिना दीड हजारांचीतथाकथित ओवाळणी मारली जात आहे. रोजचे वाणसामान, मुलांचे शिक्षण, डॉक्टर आणि हॉस्पिटलची फी, पेट्रोल आणि गॅसचे भाव वाढत चालले आहेत. महिलांशी बळेबळेचबहिणीचे नाते जोडले की त्या हे सर्व काही विसरून जातील असा शिंदे आणि मंडळींचा डाव आहे. तुम्ही-आम्ही मिळून खाऊ, आम्ही शेकडो करोडो खातो, तुम्ही हजार रुपयेघ्या, पण गप्प राहा, असा हा प्रकार आहे.

विचार

# बँकांमधील पैशाचा आटता ओघ चिंताजनक

**बँकांमध्ये ठेवी असतील, तरच त्या कर्ज देऊ शकतात. ठेवी आणि कर्जाचे प्रमाण ठरलेले असते. तो पाळला न गेल्यास बँका अडचणीत येतात. आता बँकांच्या घटत्या ठेवींसाठी बँका नागरिकांना जबाबदार धरत असल्या, तरी वसूल न झालेली कर्जे निर्लेखित करून आकड्यांची हातचलाखी करणारे बँकर्सही तेवढेच दोषी आहेत. तीन टक्क्यांच्या फरकावर व्यवहार करणाऱ्या बँकांना आपला कारभार लोकाभिमुख, पारदर्शी करावा लागेल.**



कैलास ठोळे

गेल्या दोन वर्षांपासून बँकांमधील ठेवींचे प्रमाण कमी होत चालले आहे. आता तर गेल्या वीस वर्षांमधील सर्वात कमी ठेवी बँकांकडे आहेत. अमेरिकेतील २००८ च्या मंदीच्या काळात भारतातील नागरिकांच्या बचतीचे प्रमाण ४० टक्क्यांच्या पुढे होते. कोरोनानंतर ते कमी होत गेले. आता तर हे प्रमाण साडेपाच टक्क्यांच्या आसपास असल्याचे सांगितले जाते. एकीकडे ‘एसआयपी’ मधील गुंतवणूक वाढत असताना बँकांमधील ठेवी मात्र कमी होत आहेत. त्याबद्दल रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बँकांच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. ठेवींचा दर असाच घटत राहिल्यास बँकांकडे कर्ज द्यायलाही पैसे राहणार नाहीत. कर्ज हेच बँकांच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत असून ते बंद झाल्यास बँकांचे अस्तित्व धोक्यात येईल. गेल्या १५ दिवसांमध्ये कर्जाची वाढ १३.८ टक्क्यांपर्यंत झाली तर ठेवींमध्ये १०.३ टक्क्यांपर्यंत घट झाली. ज्या वेगाने देशातील लोक म्युच्युअल फंड आणि शेअर मार्केटमध्ये रस दाखवत आहेत, त्यामुळे बँकांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. दास यांनी याबाबत अनेक वेळा इशारा दिला आहे. अर्थमंत्र्यांनी अलीकडेच सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना अधिक ठेवी आकर्षित करण्यासाठी नवीन धोरणे आखण्याचे आवाहन केले. सर्व सरकारी बँका ठेवीतील घटीबद्दल चिंता व्यक्त करत असताना सर्व शेड्युल्ड कमर्शियल बँकांच्या ठेवींमध्ये १५.७ लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे, तर कर्जांमध्ये १७.८ लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे सीडी रेशोचे प्रमाण ११३ टक्के झाले आहे.

बँकांमधील ठेवींच्या वाढीचा वेग मंदावल्याने बँकांसह सरकारच्या कपाळावर चिंतेच्या रेषा उमटल्या आहेत. अलीकडील त्रैमासिक अहवाल दाखवतात, की अनेक बँकांमधील ठेवी कमी झाल्या आहेत. कारण ग्राहक चांगल्या परताव्यासाठी शेअर बाजारासारख्या पर्यायी गुंतवणूक पर्यायांकडे वळत आहेत. ग्राहकांना बँकांमध्ये पैसे जमा करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी, बँकांनी आता विशेष ठेव योजना सुरू केल्या आहेत आणि ठेव वाढ वाढवण्यासाठी इतर काही उपायदेखील केले आहेत. एकीकडे बँकांच्या ठेवींची वाढ मंदावली आहे, तर दुसरीकडे पतवाढ वाढली आहे. स्टेट बँकेने आर्थिक वर्ष २०२५ च्या जून तिमाहीत ठेवींमध्ये घट नोंदवली आहे. बँकेची ठेवीची रक्कम ४९.१६ लाख कोटीं रुपयांवरून ४९.०१ लाख कोटी रुपयांवर घसरली आहे. त्याचप्रमाणे, बँक ऑफ बडोदाच्या ठेवीदेखील १३.२६ लाख कोटीं रुपयांवरून १३.०६ लाख कोटींवर आल्या आहेत. इतर बँकांमध्येही हा ट्रेंड दिसून आला आहे.

बँकांमधील ठेवी कमी होण्याचे प्रमुख कारण म्हणजे चालू आणि बचत खात्यातील (सीएएसए) ठेवींमध्ये झालेली घट. उदाहरणार्थ, स्टेट बँकेच्या ‘सीएएसए’ ठेवी मार्च २०२४ मध्ये १९.४१ लाख कोटींवरून जून तिमाहीत १९.१४ लाख कोटींवर घसरल्या. ठेवींच्या वाढीत घट झाल्यामुळे काही बँकांना अधिकाधिक ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विशिष्ट श्रेणींमध्ये ठेवींचे दर वाढवणे भाग पडले आहे. पत वाढ ही ठेव वाढीपेक्षा जास्त आहे. रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार, जुलै २०२४ पर्यंत पत वाढ १५.१ टक्के होती, जी एका वर्षापूर्वी १४.६ टक्के होती. याउलट, ठेव वाढ १०.६ टक्के आहे. गेल्या वर्षी ती १२.९ टक्क्यांनी वाढली होती. हा असमतोल बँकिंग क्षेत्रासाठी चिंतेचा विषय आहे. स्टेट बँक, बडोदा बँकेने ठेवी आकर्षित करण्यासाठी ठेवींवरचा व्याजदर वाढवला आहे. सात-साडेसात टक्के व्याजर असला, तरी म्युच्युअल फंडातील परताव्यापेक्षा तो फारच कमी आहे. दास यांनी बँकांना नावीन्यपूर्ण उत्पादने सादर करून आणि त्यांच्या विस्तृत शाखा नेटवर्कचा लाभ घेऊन अधिक निधी उभारण्याचे आवाहन केले आहे. सीतारामन यांनीही ठेवींच्या घसरणीवर चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी बँकांना केवळ मोठ्या ठेवींवर अवलंबून न राहता छोट्या ठेवींवर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले. सध्या बँकांमधील ठेवी कमी होत आहेत आणि कर्जाची मागणी वाढत आहे. त्यामुळे ही तफावत लक्षणीयरीत्या वाढत आहे. म्हणजेच मागणीनुसार पुरवठा होत नाही. आर्थिक वर्ष २०२४ मध्ये ज्या गतीने क्रेडिट प्रवाह वाढला होता, त्यापेक्षा ठेवींची वाढ खूपच कमी होती, त्यामुळे बँकांना ही तफावत भरून काढण्यासाठी सर्टिफिकेट ऑफ डिपॉझिट (सीडी) चा अधिक महाग मार्ग स्वीकारावा लागला. पतपुरवठ्याच्या तुलनेत ठेवीतील वाढ मंदावल्याने बँकांच्या अडचणी वाढल्या आहेत. यावर उपाययोजना करण्याच्या सूचना सरकारला देण्यात आल्या आहेत. यापैकी एक सूचना म्हणजे कर-बचत ‘एफडी’चा लॉक-इन कालावधी कमी करणे. सध्या ती पाच वर्षांची असून ती कमी करून तीन वर्षे करण्याची सूचना करण्यात आली आहे. बँकांच्या तुलनेत गुंतवणूकदार शेअर्स, म्युच्युअल फंड आणि टॅक्स सेव्हिंग इक्विटी लिंक्ड सेव्हिंग स्कीम्स (ईएलएसएस) ला कर बचतीच्या मुदतठेवींपेक्षा जास्त पसंती देत आहेत. सर्व कर बचत योजनांचा ‘लॉक-इन’ कालावधी पाच वर्षांचा असतो, त्यामुळे तो तीन वर्षांपर्यंत वाढविल्यास गुंतवणूकदारांचा कल या दिशेने वाढेल, असे बँकर्स सुचवतात.

सकल राष्ट्रीय डिस्पोजेबल इन्कम (जीएनडीआय) मध्ये कुटुंबांच्या एकूण आर्थिक बचतीचा वाटा आर्थिक वर्ष २०२१ मध्ये ६.२ टक्के होता, जो आर्थिक वर्ष २०२३ मध्ये ४ टक्क्यांवर आला. या काळात शेअर्स आणि डिबेंचर्समधील गुंतवणूक ०.५ टक्क्यांवरून ०.८ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. शेअर बाजारातील प्रचंड वाढीमुळे गुंतवणूकदार आता त्याकडे धाव घेत आहेत. बँकांकडे कर्ज घेण्यासाठी लोकांच्या रांगा लागल्या आहेत; पण लोक पैसे जमा करण्यासाठी येत नाहीत. अशा परिस्थितीत लोकांना आकर्षित करण्यासाठी काही प्रोत्साहन द्यावे लागेल. बँकांच्या गटानेही यासंदर्भात वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांशी बोलून लवकरच तोडगा काढण्यास सांगितले आहे. यासाठी ‘एफडी’वरील नियम बदलण्याची सूचनाही करण्यात आली आहे, जेणेकरून त्यात गुंतवणूक वाढवता येईल. २०२३-२४ या आर्थिक वर्षातील ठेवींपेक्षा बँकांकडून कर्ज वितरणाचा दर अधिक वाढला आहे. परिस्थिती अशी आहे की, आता बँकांकडे कर्ज वाटपासाठी निधीची कमतरता भासत असून ठेवींमध्ये वाढ होत नाही. २०२०-२१ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय ठेवींच्या प्रमाणात बँकांचा ठेवीचा दर ६.२ टक्के होता, तर २०२२-२३ मध्ये तो ४ टक्क्यांवर आला आहे. हे स्पष्ट आहे, की लोक बँकांमध्ये पैसे ठेवत नाहीत, तर त्यांना सरकारी बँकांकडूनच कर्ज घ्यायचे आहे. शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडातून मिळणारा बंपर परतावा पाहता, बहुतेक लोक या पर्यायांमध्ये आपले पैसे गुंतवतात आणि बँकेतील मुदतठेवी सातत्याने कमी होत आहे. तीन वर्षांत बँकांमधील ठेवींचा दर २.२ टक्क्यांनी कमी झाला आहे, तर शेअर बाजारातील गुंतवणूक ०.८ टक्क्यांनी वाढली आहे. म्युच्युअल फंडातील गुंतवणूक आणखी वाढत आहे. महागाई दर विचारात घेतल्यानंतरही, गुंतवणुकीचा परतावा महागाई दरापेक्षा जास्त असावा. तथापि, मुदत ठेवींवरील व्याज दर चलनवाढीच्या दरापेक्षा कमी असतो. महागाईचा दर म्हणजे वस्तू आणि सेवांच्या किमती कालांतराने वाढतात. जर चलनवाढीचा दर तुमच्या मुदत ठेवीवरील व्याजदरापेक्षा जास्त असेल, तर पैशाचे मूल्य कालांतराने कमी होईल. मुदत ठेवी फार तरल नसतात, याचा अर्थ पैसे काढायचे असल्यास त्या लवकर काढता येत नाही. मुदत ठेवी सुरक्षित गुंतवणूक मानल्या जात असल्या, तरी बँक दिवाळखोरीत जाण्याचा धोका नेहमीच असतो. मुदतीपूर्वी ठेवी काढल्या, तर बँका दंड आकारतात. दंड एकूण व्याजाच्या एक ते तीन टक्क्यांपर्यंत असू शकतो. त्यामुळे ही बँकांत ठेवी कमी होत आहेत.

बचत खात्यातील रकमेची तीन-साडेतीन टक्क्यांवर बोळवण होते, तर ज्येष्ठांना ठेवींवर दोन-तीन टक्के अधिक मिळतात. ‘सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लान’ (एसआयपी) सारख्या माध्यमातून अधिक किमान रकमांच्या आधारे जादा परतावा देणाऱ्या अनेक गुंतवणूक योजना अनेक वित्तसंस्था घेऊन येत असतील, तर ठेवीदार जादा परतावा देणाऱ्यांकडे खेचले जातात. गुंतवणुकीवर २०-२५ टक्के परतावा मिळण्याची अनेक उदाहरणे चवीने सांगितली जात असताना बँकांत ठेवीदार येतीलच कशाला, याचे उत्तर म्हणजे ठेवी कमी होणे. बँकांच्या तुलनेत भांडवली बाजार न घसरण्याची काळजी सरकारला जादा आहे. त्यातही बँकांतील ठेवींवर व्याज वाढवले, तर चलनवाढीचा धोका. त्यामुळे बँकर्सची कोंडी झाली आहे. ठेवींवरील व्याजदर कमी असल्याखेरीज पतपुरवठा स्वस्तात करता येत नाही. ही वस्तुस्थिती असताना ठेवीवर जास्त व्याज मिळते, म्हणून बँका वगळून इतरत्र ठेवी ठेवायच्या आणि इतर वित्तीय संस्थांकडून जादा व्याजाने कर्ज मिळते, म्हणून तुलनेने कमी व्याजदर असलेल्या बँकातून कर्ज घ्यायचे,हे अर्थव्यवहार म्हणून ठीक असले, तरी बँकांसाठी ते मारक आहे.

विशेष

# घराणेशाही-जय शाह यांच्या निमित्ताने

सुरज सामंत

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून लढत वर आलेल्या जय शाह ला पदावर बसवण्याच्या कहाणीनंतर, तशाच एका युवकाला म्हणजे अरुण जेटली चा मुलगा रोहन जेटली ला आता पदी बसवणार आहेत म्हणे.

वंशवादाशी लढायला सत्तेत आलेल्या मोदीचा हा लढा आहे. बाकी, सर्वाधिक वंशवादी नेते पार्टीत असताना सुद्धा वंशवादाविरोधात लढण्याचे ढोंग मात्र तेच करू शकतात.

तर ते आणि त्यांचे भक्त नेहेमी या विषयावर गळे काढत असतात म्हणून थोडं ..... नेपोटीजम बद्दल.

या शब्दाचा अर्थ आहे, स्वतःजवळ असलेल्या ताकदीचा, प्रभावाचा वापर कुटुंबियांना नोकरी मिळवण्यासाठी किंवा अन्य फायदा करून देण्यासाठी करणे.

पण मग या व्याख्येनुसार जवळपास सर्वच नेपोटीजम चे फॉलोअर्स आहेत म्हणायला हरकत नाही. व्यावसायिक आपल्या व्यवसायात उत्तराधिकारी म्हणून कुटुंबियांना प्राधान्य देतात, तेव्हा आपल्याला आश्चर्य वाटत नाही. आपल्या जवळ प्रॉपर्टी असणे पैसे असणे ही सुद्धा एक पॉवर ती आपल्या पश्चात कुटुंबियांना मिळावी ही आपली धडपड असते.

एखादी व्यक्ती चित्रपट बनवत असेल, जोखीम घेत असेल तर त्यासाठी आपल्या ओळखीच्या व्यक्तीला निवडत असेल तर काय चूक ?

ज्यांचे आर्थिक नुकसान किंवा नफा होणार आहे त्यांनी कोणाला संधी द्यायची ठरवायला काय हरकत आहे ? प्रेक्षकांना संधी मिळते ना.... नाकारण्याची. आणि फिल्म्स चे निकष व्यवसायांना का नाही लावत?

बरं, मग आपल्या पॉवरचा वापर (गैरवापर) ‘इतरांसाठी’ करणे योग्य ठरते का ? म्हणजे शाळेत ऍडमिशनसाठी राजकारण्यांची शिफारस आणणे म्हणजे त्याजागी असणाऱ्या योग्य उमेदवाराला डावलणे नाही का ?

सरकारी इस्पितळात ओळख वापरणे म्हणजे, रांगेत असलेल्याला डावलून उपचार मिळणार असे होत नाही का ?

या सगळ्याचा विचार करता, असे म्हणायला हरकत नाही की नेपोटिजमची खरी व्याख्या म्हणजे, आपल्या अधिकारांचा वापर करून आपल्या कुटुंबीय अथवा अन्य व्यक्तीला त्याची पात्रता/ क्षमता/ रांगेत क्रमांक.... वगैरे नसताना सार्वजनिक संपत्तीचा लाभ करून देणे. जेथे समाजाला त्या निर्णयात भाग घेता येत नाही.

आपल्या मर्जीतल्या / कुटुंबातल्या व्यक्तीला आपल्या अधिकारांतर्गत अथवा वशिल्याने नोकरीला लावणे, सरकारी कंत्राट मिळवून देणे, सरकारी खर्चातून मिळणारे पुरस्कार, प्रवास, भत्ते, सवलती, पदे मिळवून देणे.

किंवा आपल्या मर्जीतल्या उद्योगपतींसाठी फायद्याची धोरणे बनवणे. या प्रकाराला नेपोटीजम च म्हणायला हवे. राहिला प्रश्न राजकीय पक्षांच्या घराणेशाही/ नेपोटीजम बद्दल. पक्षांतर्गत लोकशाही असावी ही आदर्श पद्धती, पण त्याचा निकष फक्त घराण्यातले पक्षप्रमुख एवढाच असू शकत नाही.

मग, एखाद्या संस्थेच्या/ व्यक्तीच्या मर्जीनेच निवड होत असेल तर? एखाद्या खास जातीच्या/ धर्माच्या व्यक्तींनाच प्राधान्य मिळत असेल तर? आणि फक्त पक्षप्रमुख पदासाठीच हा निकष का? इतर सत्ता पदे उदाहरणार्थ नगरसेवक, आमदार, खासदार, जिल्हा परिषद सदस्य किंवा इतर पदांच्या बाबतीत हा निकष नसतो का ?

आणि जर घराणेशाहीतून येऊन देखील सक्षम असेल व निवडणूक पद्धतीने पदावर नियुक्ती होत असेल तर ?

शिवाय हे पक्षांतर्गत निर्णय पक्षाबाहेर, जनतेवर लादले जात आहेत का? की त्यांना निवडणुकीत नाकारण्याचे स्वातंत्र्य आहे? आणि अशा निर्णयांचे काय जे नागरिक नाकारू शकत नाहीत? उदाहरणार्थ जय शाह किंवा रोहन जेटली ची निवड.

हे झाले राजकीय......आता त्याही पलीकडे जाऊया.

शेकडो हजारो वर्षांपूर्वी च्या पूर्वजांच्या चांगल्या अथवा गैर वर्तणुकीमुळे मिळवलेल्या संपत्ती व पदांना उपभोगणाऱ्या, लोकशाहीमधील संस्थानिकांचे , राजांचे, नवाबांचे काय?

शेकडो वर्षांपूर्वीच्या जमिनी, हवेल्या, मालमत्ता वापरत अजूनही त्याच उपभोग घेत राजेशाहीच्या काळात वापरत जनतेला प्रजा समजणारे राजे सर्व पक्षात आहेत आणि नागरिकही प्रजा बनण्यात धन्यता मानते, त्यांच्या मानापमानासोबत आपल्या भावना संलग्न ठेवते. याबद्दल काय?

घराणेशाही नको म्हणजे आपल्याला आवडत्या व्यक्तीची, पक्षाची किंवा आपल्याला फायदा होणारी सोडून इतरांची नको असा त्याचा अर्थ आहे का ?

नगरसेवकांच्या मुलांचे, नातवंडांचे बॅनर लावणारे, लोकप्रतिनिधींसमोर जाताना कणा घरी ठेवून जाणारे, सरकारी अधिकाऱ्यांसमोर नाक घासणारे.....नाईलाजाने, लोभासाठी किंवा प्रगल्भतेच्या अभावाने ... प्रजाच असते.

त्यामुळे आपले निकष सतत तपासणे, सुधारणे उत्तम!

(साभार)

लोकसंसद

## यंदा गणेशोत्सवात ध्वनीप्रदूषण कमी होईल?

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. बाप्पाच्या आगमनासाठी आतुर असलेल्या भाविकांची घरोघरी लगबग सुरु आहे. सर्वत्र बाजारपेठा उत्साहाने फुलून गेल्या आहेत. एकीकडे असे हर्षोल्हासाचे वातावरण असताना दुसरीकडे सालाबादप्रमाणे यंदाही गणेशोत्सवातील वाढत्या ध्वनीप्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गणेशोत्सव म्हणजे कमालीचे ध्वनीप्रदूषण असे एक नवे समीकरण गेल्या काही वर्षात रूढ होऊ लागले असून हे चिंताजनक समीकरण सर्वांनीच गृहीत धरले आहे. वास्तविक दरवर्षी गणेशोत्सव साजरा करताना ध्वनीप्रदूषण होऊ नये यासाठी आवाजसंहितेचे पालन करण्याचे आवाहन संबंधित शासकीय यंत्रणांकडून करण्यात येते. पण कानठळ्या बसविणाऱ्या आवाजावर कोणाचेही नियंत्रण नसते. ध्वनीप्रदूषण अधिनियमांची ऐसी की तैसी करून दरवर्षी आवाजाची मर्यादा ओलांडली जाते. ध्वनी प्रदूषणाची तीव्रता १५० डेसिबलपर्यंत पोहोचल्यामुळे नागरिकांना बहिरेपणा, रक्तदाब, हृदयरोग अशा अनेक आजारांना सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर, एका जनहित याचिकेवर निकाल देताना राष्ट्रीय हरित लवादाने सर्व गणेश मंडळांना आवाजाची मर्यादा पाळण्याचे आदेश दिले आहेत. तसेच ध्वनिप्रदूषण नियमावलीचे उल्लंघन झाल्यास दोषी गणेश मंडळावर कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे यंदा गणेशोत्सवात ध्वनीप्रदूषण कमी होईल अशी अपेक्षा आहे.

**-प्रदीप शंकर मोरे**

# मराठी साहित्यिक दिनविशेष

**३ सप्टेंबर**

**१८५५:-**अवधूत संप्रदायी ब्रवेत्ते व कवी दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी यांचा जन्म. विद्यार्थी दशेतच श्री बालमुकुंद या सिध्दी पुरुषाकडून अवधूत मार्गाची दीक्षा. लेखन, प्रवचन, भजन याद्वारे त्यांनी आय ुष्यभर अद्वैत तत्वाचा बोध करुन घेण्याचा प्रयत्न केला. त्यांचे सर्व लेखन ‘श्रीदत्तप्र `मलहरी पुष्पमालाफा नावाने ८ खंडातून प्रसिध्द झाले. पदे, अभंग, आरत्या, अष्टके ही स्फूट व उपदेशपर प्रवचने, परमानुभव प्रकाश, आत्मज्योती, गीतासार इ. ग्रंथ व पत्रे ह्यांचा ह्या खंडात समावेश झालेला आहे. **१९०८:-** संवाद लेखक, गीतकार नाटयाभ्यासक, दिग्दर्शक कॅप्टन माधव कृष्णाजी शिंदे यांचा जन्म. ‘आधुनिक शस्त्रास्त्र ` मराठी रंगभ ुमी आणि विकास’ या पुस्तकांसह ‘सावली’, ‘डोंगरमाथ्यावरील दिवा’,‘प्रतिध्वनी’ हे कथासंग्रह, राष्ट्रसंत तुकडोजी सह विदर्भातील काही थोर व्यक्तींची चरित्रे, लोकसाहित्यावर ‘लोकसाहित्य संपदा’ आणि दुर्गादर्शन’ हे काव्यावरचे पुस्तक याशिवाय १५ नाटके, चार-पाच कादंबऱ्या मिळून ८० पुस्तके लिहिली.

**१९२२:-**लेखक, प्रवचनकार, कीर्तनकार संत कृष्णाजी आडकू लोधीकर यांचा जन्म. **१९२३:-**‘ महाराष्ट्राची लोकधारा’ या कार्यक्रमातून महाराष्ट्र राज्याची वैभवशाली परंपरा देशविदेशात पोहचवणारे ‘महाराष्ट्रशाहीर, गीतकार, संगीतकार, नाटककार, आत्मचरित्रकार शाहीर कृष्णराव गणपतराव साबळे यांचा जन्म. पं. नेहरुंच्या उपस्थितीत सोलापूरात शेतकरी मेळाव्यात ‘जय जय महाराष्ट्र माझा’ हे गीत शाहीरा ंच्या मुखातून प्रथम बाहेर ले.हैद्राबाद, गोवा मुक्ती आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ यात त्यांच्या शाहीरीची ड’ प्रभावीपणे दुमदुमली. मुक्त नाटय हा लोकनाटय व नाटक यांचे मिश्रण असलेला कलाप्रकार रुढ केला. **१९३१:-** नाटककार शाम त्रिंबक फडके यांचा जन्म. ‘काका किशाचा’,‘खोटेबाई आता जा’ आदी गाजलेल्या नाटकांचे, तसेच काही कुमार-कादंबरीका आणि बालनाटयांचे लेखन त्यांनी केले होते.

**१९३२:-**‘प्रतिष्ठान’ या मासिकाचे आणि साहित्य अकादमीतर्फे प्रकाशित होणाऱ्या ‘प्रातिनिधिक मराठी कविता’ या पुस्तकाचे संपादन करणारे लघुकथाकार प्रा. तुकाराम शंकर कुलकर्णी यांचा जन्म. ‘अखेरच्या वळणावर’, ‘ग्रीष्म रेखा’,‘तृणाची वेदना’ ह्या लघुकथा त्यांच्या प्रकाशित झाल्या आहेत. **१९३५:-**संत साहित्य या विषयावर लेखन, प्रवचन करणारे प्रा.डॉ. कृ.ज्ञा. भिंगारकर यांचा जन्म.‘साधुसंत येती घरा भाग १,२’ ह्या ‘अक्कलकोट स्वामी’,‘गजानन महाराज शेगाव’‘मल्हारी मार्तंड’,‘महाप्रभू चैवज्ञ’, ‘आद्यक्रांती कारक फडके’,‘श्री विठ्ठल महात्म्य’,‘साईबाबा’ आर्दीची चरित्रे त्यांची साकारलीत. **१९३५:-** माजी खासदार, शेतकरी संघटन`चे संस्थापक, शेतीविषयक प्रश्नांचे जाणकार आणि या विषयातील एक सिध्दहस्त लेखक श्री. शरद अनंत जोशी यांचा जन्म. बँकिंग क्षेत्रात सुवर्णपदक फडकवलेल्या जोशींनी ‘शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपध्दती’,‘स्वातंत्र्य का नासते?’, ‘बळीचे राज्य येणार’,‘राष्ट्रीय कृषिनिती’ मिळून १५ पुस्तके, ५ इंग्रजी, २ हिंदी पुस्तकांशिवाय ‘साप्ताहिक वारकरी’चे संपादक तसेच काही पुस्तके त्यांनी संपादितही केली आहेत.

**१९३८:-** लेखक, इतिहाससंशोधक काशिनाथ कृष्ण लेले यांचे निधन. धार संस्थानचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास त्यांनी उजेडात आणला.**१९३८:-**विविध नियतकालिकांतून वैज्ञानिकांची चरित्रे, विज्ञानपर लेख तसेच कथा लेखक डॉ. पुष्पहास नारायण पुरेकर यांचा जन्म. ह्यांची ‘गोळे मिसळ’ हा कथासंग्रह तर ‘कले नाटुकले’ (एक नाटिका) अशी साहित्य संपदा. **१९४०:-**लेखक प्रा. मनोहर आबाजी कुलकर्णी यांचा जन्म. ‘मानवाची मुक्तिगाथा’ हे पुस्तक त्यांचे प्रकाशित झाले आहे. **१९४२:-** लेखक श्रीधर देविदास इनामदार यांचा जन्म. ‘अरण्यरुदन व रंगसावल्या’ हे त्यांचे कथासंग्रह, तर ‘काचेचा पिंजरा’,‘दिगंतराचे पक्षी’ हे त्यांनी केलेले अनुवाद प्रकाशित झाले आहेत.‘प्राक्तनांचे संदर्भ’ हा त्यांच्या समीक्षापर लेखांचा संग्रह. **१९४४:-** कवी व साठोत्तरी मराठी साहित्याचे गाढे अभ्यासक चंद्रकांत नागेशराव पाटील यांचा जन्म.‘बायका आणि इतर कविता’,‘इत्यंभूत’ हे कवितासंग्रह. ‘आणि म्हणूनच’ व ‘विषयांतर’ ही समीक्षापुस्तके तसेच ‘रसगंधर्व’ हे नाटक त्यांनी लिहिले. ‘तमस’ ही कादंबरी आणि काही संपादीत साहित्य त्यांच्या नावावर आहे. **१९५०:-** पुणे विद्यापीठाचे कुलगुरु पद भुषवलेले डॉ.अशोक सदानंद कोळस्कर यांचा जन्म. विविध नियतकालिकांमधून त्यांचे ५०हून अधिक श्धोा निबंध प्रसिध्द. **१९५२:-** लेखिका, पेशाने सिव्हिल जज्ज, सुनेत्रा पांडुरंगपंत वैद्य यांचा जन्म. ‘अशी वकिली असे अशील’ ह्या ललित लेखसंग्रहासह ‘कवडसे’ हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९५८:-**साहित्यिक प्रमोद संभाजी लांडगे यांचा जन्म. ह्यांचा ‘गलोल’, ‘सोलापूरच्या बंडखोर कविता’‘जाणीव’ हा काव्यसंग्रह, ‘सुरुंग’ हा पटनाटयसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९५८:-**राष्ट्रीय वृत्तीचे कवी, बालसाहित्यिक माधव केशव काटदरे यांचे निधन. त्यांच्या कविता ‘खेळगडी, चित्रमय जगत’ आदी मासिकातून प्रसिध्द. ‘ध्रुवावरील, फुले’ ‘फेकलेली फुले’,‘कवी माधव यांची कविता व गीत माधव’ हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिध्द. कवितांमधील विषयांची निवड व काव्यदृष्टी पंडिती थाटाची असून त्याचा कल बा`धवादाचा आहे.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३ सप्टेंबर

१) श्रीम. मालती दत्तात्रेय खानविलकर
श्रीबाग-३, अलिबाग, ३-९-१९३९
२) श्री. दयाराम गोविंद काठे
कामथ, अलिबाग, ३-९-१९३६
३) श्रीम. शुभदा शरदचंद्र ठोसर
बी विंग, अलिबाग ३-९-१९४५
४)श्री.अनंत दत्तात्रेय लेले
लेलेवाडी, वरसोली, ३-९-१९५२
५) श्रीम.सुनंदा रोहिदास झाबरे
विद्यानगर, अलिबाग ३-९-१९५२


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**


# मुख्यमंत्र्यांचा जिल्हा अनुदानाविना

## ■ प्राथमिक शाळांतील शिक्षकांचे वेतन रखडले

**। ठाणे । प्रतिनिधी ।**
**ठाणे जिल्ह्यातील अंशतः अनुदानित खासगी प्राथमिक शाळांत २०, ४०, ६० टक्के अशा तुटपुंज्या पगारावर कार्य करणाऱ्या शिक्षकांचे मागील दोन महिन्यांचे वेतन रखडले आहे. सरकारकडून अंशतः शिक्षकांसाठी निधी उपलब्ध करून देताना अनेकदा अडचणी येत असल्याने वारंवार पगार रखडत आहेत. त्यामुळे आर्थिक गर्तेत सापडलेल्या शिक्षकांनी गणेशोत्सवापूर्वी वेतन न मिळाल्यास ठाणे वेतन अधिक्षक कार्यालयासमोर उपोषणाला बसण्याचा निर्धार केला आहे.**



जिल्ह्यातील २०, ४० आणि ६० टक्के अनुदानावर काम करणाऱ्या खासगी प्राथमिक शाळांतील शिक्षकांना १२ हजार ते ४० हजारपर्यंत वेतन दिले जाते. मात्र, शिक्षकांना हे वेतनही वेळेवर दिले जात नाही. दरवेळी इतर जिल्ह्यांना निधी मंजूर केला जात असताना ठाणे जिल्ह्यालाच सापत्न वागणूक देत निधी रखडवला असल्याची सद्यस्थिती आहे. मुख्यमंत्र्यांच्या ठाणे जिल्ह्याला शिक्षकांच्या पगारासाठी निधी मिळाला नसल्याने जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यांचे अंशतः अनुदानित शिक्षकांचे वेतन रखडले आहे. मागील महिन्यात ठाणे जिल्ह्यासाठी आवश्यक निधीच्या ५० टक्केच निधी उपलब्ध झालेला होता. यामुळे नियमित वेतन होऊ शकले नाही. ४ दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवापूर्वी जर या शिक्षकांना वेतन मिळाले नाही तर गणेशोत्सव साजरा करण्याऐवजी ठाणे वेतन अधिक्षक कार्यालयासमोर उपोषणाला बसण्याचा निर्धार शिक्षकांनी केला आहे.

> **शिक्षकांच्या वेतनासाठी सध्या योग्य प्रमाणात निधी उपलब्ध नसल्याने वेतन रखडले आहे. प्रत्येक जिल्ह्यातील वेतन अधिक्षकांनी योग्य वेळी, योग्य प्रमाणात निधीची मागणी केल्यास अशी समस्या उद्भवणार नाही. दरम्यान शिक्षक आमदार म्हणून शिक्षण संचालक व मंत्रालय स्तरावर प्रयत्न करून निधी मंजूर करून घेतला असून सोमवारनंतर गणेशोत्सवापूर्वी रखडलेले पगार होण्याची शक्यता आहे.**
> **– आ. ज्ञानेश्वर म्हात्रे, कोकण शिक्षक मतदारसंघ**

### काळा शिक्षक दिन साजरा करणार

**शंभर टक्के अनुदानावरील शिक्षकांचे पगार वेळेवर होत असताना अंशतः अनुदानित शाळांच्या ३ हजार २६१ या लेखाशिर्षासाठी निधीची कमतरता असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. दरम्यान अनेक शिक्षकांचे कर्जाचे हप्ते थकल्याने बँकेकडून विचारणा केली जात आहे. शिवाय गणेशोत्सव तोंडावर असताना दोन महिने पगार नसल्याने सणासुदीला या शिक्षकांवर उपासमारीची वेळ आली आहे. यामुळे संतापलेल्या शिक्षकांनी ५ सप्टेंबर रोजी काळा शिक्षक दिन साजरा करण्याचा व गणेशोत्सवापूर्वी वेतन न मिळाल्यास आमरण उपोषणाला बसण्याचा निर्धार करण्यात आला आहे.**

## ठाण्यातील हातभट्टी अड्ड्यांवर धाड

**। ठाणे । प्रतिनिधी ।**
ठाण्यातील खाडी किनारी सुरु असलेल्या गावठी दारु निर्मितीच्या अड्डयांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या ठाणे पथकांनी धडक कारवाई केली आहे. या कारवाईत गावठी दारु निर्मितीसाठी लागणाऱ्या रसायनासह १३ लाख ५६ हजारांचा मुद्देमाल जप्त करुन नष्ट करण्यात आला आहे.



राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या विशेष मोहिमेंतर्गत खाडी किनारी असलेल्या अड्डयांवर ३१ ऑगस्ट रोजी धाडसत्र राबवून कारवाई करण्यात आली. हातभट्टीद्वारे तयार होणाऱ्या गावठी दारूचे समूळ उच्चाटन करण्यासाठी कोकण विभागीय उपायुक्त प्रदीप पवार यांनी विशेष धाडसत्र मोहीम सुरु केली आहे. याच अनुषंगाने अधीक्षक प्रविण तांबे यांच्यासह उप अधीक्षक वैभव वैद्य, अभिजित देशमुख, तसेच निरीक्षक महेश धनशेट्टी, संजय ढेरे, आनंद पवार आणि दीपक परब आदींच्या पथकांनी वडवली, आगासन, अंबरनाथ, उंबरडे, वसावली, अंजुर, आलिमघर आणि देसाई गावासह इतर ठिकाणच्या खाड़ी आणि अति दुर्गम भागात जाऊन शनिवारी दिवसभर ही कारवाई केली आहे.

## शिरगाव येथे महिलेला मारहाण

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
शिरगाव-नाखवामोहल्ला येथे ३१ ऑगस्ट रोजी एका महिलेला झालेल्या मारहाणीतील सात जणांविरुद्ध शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिरीन एजाज नाखवा, एजाज नाखवा, इम्रान नाखवा, खैरुन नाखवा, आतिफा इम्रान नाखवा, आफ्रीन एजाज नाखवा, अरसलान एजाज नाखवा अशी संशयितांची नावे आहेत. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संशयितांनी पीडीत महिलेच्या घरासमोर येऊन शिवीगाळ केली होती. यापैकी संशयित इमरान व अरसलानकडून लाकडी काठीने या महिलेला मारहाण करण्यात आली होती.

## मोरबे धरणाने काठ गाठला



**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**
खारघर, कामोठेसह नवी मुंबईकरांची तहान भागविणाऱ्या मोरबे धरण क्षेत्रात मागील दोन महिन्यात पावसाने जोरदार हजेरी लावाली होती. यामुळे मोरबे धरण पुर्ण क्षमतेने भरल्याने नागरिकांची वर्षभराची पाण्याची चिंता मिटली आहे. तसेच, धरणाने काठ गाठल्याने पालिकेने गुरुवार दि.२९ ऑगस्ट रोजी विधीवत जलपूजन करुन पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे. यावेळी आ. गणेश नाईक, पालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ.कैलास शिंदे यांच्या हस्ते आणि माजी महापौर सुधाकर सोनावणे व जयवंत सुतार, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे आणि माजी लोकप्रतिनिधी, पालिकेचे वरिष्ठ अधिकारी यांच्या समवेत जलपूजन संपन्न करण्यात आले. यानंतर आ. गणेश नाईक यांच्या हस्ते रिमोट कंट्रोलची कळ दाबून धरणाचे दरवाजे १० सेमीने उघडण्यात आले.

## विद्यार्थिनीचा आत्महत्येचा प्रयत्न

**। पालघर । प्रतिनिधी ।**
गेल्या एक ते दोन महिन्यांत आत्महत्येच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. यातच मागील महिन्यात जव्हार प्रकल्पांतर्गत दोन आश्रम शाळांमध्ये एका विद्यार्थिनीने अंगावर पेट्रोल ओतून आत्महत्या केली. तर, दुसऱ्या शाळेत एका चिमुकल्याचा मृत्यू झाला आहे. रविवारी (दि.१) रानशेत येथील आश्रम शाळेत १६ वर्षीय दहावीच्या विद्यार्थिनीकडून आत्महत्या करण्याचा प्रयत्न करण्यात आला. बाथरूममध्ये ओढणीच्या साहाय्याने गळफास लावल्यामुळे तिचा जीव थोडक्यात बचावला आहे. सध्या तीच्यावर वलसाड येथे उपचार सुरू आहेत.

## विद्यार्थ्यांसह प्रवाशांचे हाल

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
वाहतुकीचे कोणतेही साधन उपलब्ध नसलेल्या सातुळी आणि बावळाट गावांत बस नियमित वेळेत पोहोचत नसल्यामुळे तसेच सुट्टीच्या दिवशी बससेवाच उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांसह प्रवाशांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याकडे अनेकदा लक्ष वेधुनही दुर्लक्ष केल्याने संतप्त ग्रामस्थांनी सावंतवाडी आगारप्रमुख नीलेश गावितांना जाब विचारण्यात आला. यावेळी सरपंच यांच्यासह ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेत गावित यांना धारेवर धरले होते. गावात नियमित वेळेत आणि सुट्टीच्या दिवशी बससेवा नसल्यामुळे विद्यार्थ्यांसह प्रवाशांना सामोरे जाव्या लागणाऱ्या समस्यांचा पाढा वाचण्यात आला. याबाबत तत्काळ कार्यवाही न केल्यास दाणोली बाजारपेठेत एसटी रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता.

## ‘माझा गणपती’ कार्यशाळेचे आयोजन


**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
परशुराम एज्युकेशन सोसायटी चिपळूण संचालित युनायटेड इंग्लिश स्कूलच्या गुरुकुल विभागातील विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हस्तकौशल्यातून बनवलेल्या आकर्षक गणेश मूर्तींचे प्रदर्शन मांडण्यात आले होते.गुरुकुल विभागामार्फत प्रेमजी भाई आसर प्राथमिक विभागातील चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी ‘माझा गणपती’ कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत इयत्ता चौथीच्या २८० विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला.

यावेळी कार्यशाळेत मुलांना शाडू माती पासून गणपती तयार करणे विषयी मार्गदर्शन व प्रात्यक्षिक गुरुकुलातील अध्यापक पराग लघाटे यांनी केले. यानंतर मुलांनी आपल्या कल्पनांचा उपयोग करून शाडू मातीच्या छान आकर्षक गणेश मूर्ती तयार केल्या. गुरुकुलातील आठवी नववी दहावीच्या विद्यार्थ्यांनी चौथीच्या कार्यशाळेतील सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक व सहाय्यक म्हणून मदत केली आणि पूर्ण दिवसभर कार्यशाळेचे व्यवस्थापन करण्याचा अनुभव घेतला.



## खैराची तस्करी रोखण्यात यश

**। पालघर । प्रतिनिधी ।**
मुंबई-अहमदाबाद महामार्गावर टेन ग्रामपंचायत जवळील रस्त्यावर वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी संशयित टेम्पोचा पाठलाग करून त्या टेम्पोला अडविण्यात आले. या टेम्पोचा चालक फरार झाला असून टेम्पोमध्ये तीन टन वजनाचे खैराचे सोलीव ओंडके आढळून आले आहे. यावेळी टेम्पोसह खैराचे ओंडके जप्त करण्यात आले आहेत. तसेच, खैराच्या झाडांची कत्तल आणि तस्करी प्रकरणी अज्ञात टेम्पो चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मनोर वन परिक्षेत्रातून मौल्यवान खैराच्या झाडांची कत्तल आणि तस्करी रोखण्यासाठी वनपरिक्षेत्राच्या हद्दीत रात्रीच्या वेळी गस्त सुरू करण्यात आली आहे. शुक्रवारी रात्री मनोर विक्रमगड रस्त्यावरून खैराच्या ओंडक्यांची तस्करी होणार असल्याची माहिती वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना मिळाल्याने कारवाईसाठी जागरूक ग्रामस्थांची मदत घेत मनोर- विक्रमगड रस्त्यावर सापळा रचण्यात आला होता. शनिवारी पहाटेच्या सुमारास महामार्गावरील जव्हार फाटा येथून एक टेम्पो भरधाव वेगात जात असल्याचे दिसताच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी दोन वाहनांच्या मदतीने संशयीत टेम्पोचा पाठलाग सुरू केला. पाठलाग सुरू असल्याचे कळताच चालकाने पकडले जाण्याच्या भीतीने निर्जन रस्त्यावर टेम्पो उभा करून अंधाराचा फायदा घेत पळून गेला. वनविभागाचे कर्मचारी टेम्पो जवळ पोहोचल्या नंतर टेम्पोची तपासणी केली असता टेम्पोमध्ये खैराच्या झाडांचे तीन टन वजनाचे सोलीव ओंडके आढळून आले.

ही कारवाई वनक्षेत्रपाल वैभव सातपुते यांच्या मार्गदर्शनात वनपाल समाधान पाटील, वनरक्षक तेजस सुतार, शैलेश गांगोडा, साईनाथ कुवर, कांचन वळवी आणि वैभव जगदाळे यांच्या पथकाने केली. सावरखंड गावातील महेंद्र गोवारी यांच्यासह संदीप पाडेकर, रामदास पाडेकर आणि विश्राम पाडेकर यांनी मदत केली.

## शिक्षक पतपेढीची वार्षिक सर्वसाधारण सभा

**। अलिबाग । वार्ताहर ।**
कर्जत येथील रॉयल गार्डन मंगल कार्यालयात (दि.२५) रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढीची वार्षिक सभा संस्थेचे अध्यक्ष भगवान घरत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.



यावेळी घरत यांनी संस्थेच्या यशस्वी वाटचाली विषयीची माहिती आपल्या प्रास्ताविकात विशद केली. उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना संस्थेच्या यशस्वी वाटचाली बद्दल संस्थेच्या पारदर्शक कारभाराबद्दल गौरवोद्गार काढले. शिक्षक पतपेढी ही शिक्षकांची कामधेनू असते. ती सर्वांच्या सहकार्यानेच आणि विश्वासानेच यशस्वी वाटचाल करू शकते, असे मत गटशिक्षणाधिकारी दौड यांनी व्यक्त केले. तसेच, मान्यवरांनी संस्थेच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सभेच्या दुसऱ्या सत्रात सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील सभेचे इतिवृत्त वाचन राजेंद्र पाटील यांनी केले.विषयपत्रिकेप्रमाणे विषयांचे वाचन घरत यांनी केले.

या सभेसाठी प्रमुख अतिथी म्हणून कर्जत पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी संतोष दौड, माजी सभापती मनोहर थोरवे, रा.जि. प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष राजेंद्र म्हात्रे तसेच रेश्मा धुमाळ, राजेंद्र पाटील, राजेश सुर्वे, नरेंद्र गुरव, नरेश सावंत, उमेश महाडेश्वर, रविंद्र पालकर, निलेश साळवी, सुशील वाघमारे, जितेंद्र बोडके, देवानंद गोगर, वैभव पिंगळे, प्रमोद भोपी, राजेंद्र फुलावरे, बालाजी गुबनरे, प्रफुल्ल पवार, प्रतिभा पाटील, दयानंद अंजर्लेकर, सुरेंद्र शिंदे, संदेश पाटील आणि कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## समुद्री शैवालाची शेती

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचे आणि रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी सागरी शैवाल शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी कोकणचा समुद्री शैवाल शेती कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. कोकणात पसरलेल्या विस्तीर्ण किनारपट्टी भागात समुद्री गवत आणि सागरी शैवाळ शेतीसंदर्भात अभ्यासगट स्थापन करण्यात आला होता. शेतकऱ्यांना लागवडीसाठी उद्युक्त करण्यात येणार असून, अतिरिक्त उत्पन्नांचे स्रोत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

## जनावरांच्या मालकांवर कारवाईची मागणी



**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
रत्नागिरी ते पावस या सागरी मार्गावर मोकाट जनावरांच्या वावरामुळे वाहन चालकांना हा रस्ता धोकादायक ठरत आहे. यामुळे हा परिसर दिवसेंदिवस अपघात क्षेत्र बनत आहे. तसेच, मोकाट जनावरांच्या मालकांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक व वाहनचालकांकडून जोर धरत आहे.

फणसोप, कसोप, कुर्ली, मागलाड, कोळंबे, गोळप या गावातील अनेक शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात पशुधन आहे. पूर्वी या जनावरांच्या पाठीवर गुराखी असायचे; परंतु सध्या ही पद्धत बंद झाल्यामुळे जनावरांना माळरानावर सोडले जाते. गावठाण भागामध्ये आंबा कलमांच्या जागा असल्यामुळे त्या बंदिस्त असतात. यामुळे रत्नागिरी ते पावस या कातळ सड्यावर जनावरे सोडली जातात. दिवसभर रानात चरून रात्रीच्या वेळी ही जनावरे रस्त्यावर ठाण मांडतात. याचा त्रास या मार्गावरून जाणाऱ्या दुचाकी वाहनांना मोठ्या प्रमाणात होत आहे. यामुळे या मार्गावर अनेक छोटे मोठे अपघात घडत असतात.

काही महिन्यांपूर्वी नाखरे गावात मोकाट जनावरांपासून होणाऱ्या त्रासापासून वाचवण्यासाठी ग्रामसभेमध्ये ठराव करण्यात आला होता. ज्या मालकांची जनावरे आंबा बागायतदार व अन्य शेतीचे नुकसान करतील त्या मालकांवर कारवाई करण्याचे आदेश ग्रामपंचायतीच्या माध्यमातून करण्यात आले आहेत. त्याप्रमाणे या मार्गावरील प्रत्येक ग्रामपंचायत याबाबत ठोस निर्णय घेऊन जनावरांच्या मालकांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

### महामार्ग पोलिसांकडून नियोजनला सुरुवात

# गणेशभक्तांचा वाहतूक कोंडीमुक्त प्रवास

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
**कोकणात येणारे चाकरमानी व गणेशभक्तांचा प्रवास यंदा वाहतूककोंडी मुक्त होण्यासाठी महामार्ग पोलिसांकडून नियोजन सुरू करण्यात आले आहे. यावेळी गणेशोत्सवासाठी जादा पोलीस बंदोबस्त मागविण्यात आला असल्याची माहिती राष्ट्रीय महामार्ग विभागाचे पोलीस निरीक्षक विक्रमसिंह पाटील यांनी दिली आहे.**



मुंबईकर चाकरमान्यांना गणेशोत्सवाचे वेध लागले असून त्यांचे गावाकडे येण्याचे नियोजन सुरू झाले आहे. यासाठी साहित्य खरेदी, गाड्यांचे आरक्षण याची जूळणी सुरू झालेली आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर काही दिवसातच महामार्गावर मोठ्याप्रशाणात वाहतुकीला सुरूवात होईल. गणेशोत्सव कालावधीत अवजड वाहतूक बंद ठेवण्यात येत असली तरीही महामार्ग चौपदरीकरणाचे काम सुरू असल्यामुळे अनेक ठिकाणी अडचणी निर्माण होतात. या गोष्टी लक्षात घेऊन राष्ट्रीय महामार्ग पोलीसांनी नियोजन करण्यास सुरुवात केली आहे.

गणेशोत्सव काळात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ड्रोन कॅशेऱ्यांद्वारे नजर ठेवण्यात येणार आहे. जीवनावश्यक वस्तूंची वाहने वगळून या काळात इतर सर्व १६ टनांच्या अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. चाकरमान्यांचा प्रवास हा निर्विघ्न व्हावा, यासाठी पोलिसांचा बंदोबस्त राहणार आहे. यामध्ये २७ पोलीस अधिकारी व कर्मचारी, वॉकीटॉकी, टोकन क्रेन, रुग्णवाहिका, सीसीटीव्ही तैनात असतील. महामार्गावर मोटारसायकल पेट्रोलिंगही सुरू राहणार आहे.

### अवजड वाहनांना बंदी

**गणेशोत्सव काळात ५ सप्टेंबर रोजी रात्री १२ वाजल्यापासून ते ८ सप्टेंबर रोजी रात्री अकरा वाजेपर्यंत आणि ११ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते १३ सप्टेंबर ११ वाजेपर्यंत, तसेच १७ सप्टेंबरला रात्री ८ वाजल्यापसून ते १८ सप्टेंबर रोजी रात्री ४ वाजेपर्यंत १६ टन व त्यापेक्षा अधिक अवजड वाहनांना बंदी आहे.**

> **मुंबई–गोवा महामार्गावर खेड, चिपळूण शहरातील कळबस्ते, बहादुरशेख नाका, पाग नाका, सावर्डे, आरवली, संगमेश्वर या ठिकाणी जादा पोलीस तैनात करण्याची गरज आहे. आम्ही वरिष्ठांकडे ५० जादा पोलीस मागितले आहेत.**
> **– विक्रमसिंह पाटील, पोलीस निरीक्षक, महामार्ग विभाग.**

**निवडक**

## अध्यक्षपदी संतोष आमले

**पनवेल :** मुंबई विभागीय दादासाहेब फाळके चित्रपट संघटनेच्या पनवेल अध्यक्षपदी संतोष आमले यांची निवड झाली आहे. संघाचे ध्येय धोरणे व कार्यक्रम राबविताना संघटनेच्या मजबुतीसाठी प्रयत्न करावेत या उद्देशाने त्यांची निवड करण्यात आली. संघटनेचे अखिल भारतीय अध्यक्ष अजीत म्हामूनकर यांनी नियुक्तीपत्र दिले आहे. चित्रपट क्षेत्रात सकारात्मक विचार रुजावेत तसेच समाजप्रबोधनपर चित्रपट निर्माण व्हावेत या प्रयत्न करणार असल्याचे आमले यांनी सांगितले.

## घरफोडी करणारा गजाआड

**पनवेल :** वावंजे येथे बंद घरात घरफोडी करणाऱ्या गुन्हेगारास पनवेल तालुका पोलिसांनी गजाआड केले आहे व त्याच्याकडून चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. उत्तम कुरकुटे यांचे घर बंद असल्याचे पाहून शाकिर खान याने त्यांच्या घराच्या दरवाजाचा कडीकोयंडा तोडून घरातील दागिने, रोख रक्कम असा मिळून जवळपास १ लाख ३१ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेला होता. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे.

## मंगळागौरी नृत्य स्पर्धा

**रसायनी :** पवित्र श्रावण महिन्यात खास महिलांकरिता त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी श्रावणसरी नृत्य स्पर्धा आयोजीत करण्यात आल्या होती. यावेळी श्रावणसरी मंगळागौरी स्पर्धेमध्ये तालुक्यातील जवळजवळ बारा संघाने भाग घेतला होता.यात प्रथम क्रमांक सखी महिला ग्रुप, द्वितीय क्रमांक नवदुर्गा ग्रुप रसायनी, तर तृतीय क्रमांक नारायणी ग्रुप खोपोली यांनी पटकावले. हा कार्यक्रम पाहण्यासाठी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## केंद्रप्रमुखांचा केला सन्मान

**खोपोली:** नुकत्याच पार पडलेल्या रायगड जिल्हा परिषद केंद्रप्रमुख भरती प्रक्रियेत खालापूर तालुक्याच्या शिक्षण क्षेत्रात मोलाचा वाटा सणाऱ्या आदर्श शिक्षकांना केंद्रप्रमुखपदी बढती दिल्याबद्दल खालापूर शिक्षक संघाच्यावतीने जयंत पाटील, संतोष पाटील यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष सचिन कडू, जगदीश मोहने, तालुका कार्याध्यक्ष मारुती दासरे, सहसरचिटणीस बळीराम चव्हाण, राम बिरादार आदी उपस्थित होते.

## ८० हजारांच्या टायरची चोरी

**पनवेल :** ८० हजार रुपये किंमतीच्या आठ टायरची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना तालुक्यातील अजिवली गाव प्रिती लॉजिस्टीक समोर घडली आहे. अभिषेक सिंह याने दिलेल्या फिर्यादीनुसार ते काम करीत असलेल्या आर.के. ऑटोमोबाईल कंपनीच्या ४ टँकरचे ८ टायर ज्याची किंमत जवळपास ८० हजार रुपये इतकी आहे. अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# चाकरमान्यांची पावले गावाकडे



**■ रायगडात गाव, खेड्यापाड्यातील बंद घरांची कुलपे उघडली**

**■ बाप्पाच्या आगमनासाठी सारेच सज्ज**

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

कोकणातील महत्त्वाचा आणि सर्वांचा सण म्हणजे गणेशोत्सव आहे. अवघ्या काही दिवसांवरत गणपती सण येऊन ठेपला आहे आणि रायगड जिल्ह्यात गणेशोत्सवाची धामधूम सुरू झाली आहे. येथील बाजारपेठ सजल्या आहेत. गाववाड्यांमध्ये गणेशोत्सवाच्या तयारीची लगबग दिसत आहे.

येथील खेड्यापाड्यातील व वाडीवस्तीवरील बहुसंख्य लोक पुणे मुंबईसह इतर शहरात कामानिमित्त राहतात. मात्र गणेशोत्सवाला आवर्जून गावी येतात. त्यामुळे इतर दिवशी ओस पडलेली गावे व वाड्यांमध्ये आता नवचैतन्य आले आहे. शिवाय येथील अनेक मंडळे गणेशोत्सवात विविध प्रबोधनात्मक व लोकोपयोगी उपक्रम देखील राबवितात. स्थानिक बाजारपेठ विविध वस्तूंनी बहरल्या आहेत.

गणपती सणानिमित्त अनेक चाकरमानी, लहानगे, तरुण व तरुणी आपल्या गावी येत आहेत. त्यामुळे वर्षभर बंद असलेल्या काही घरांचे टाळे आता उघडले आहेत. तसेच एकांतात राहणाऱ्या वृद्ध मंडळींना देखील आपले मूलबाळ, नातवंडे व नातेवाईक घरी आल्याने आनंद होतो. ते प्रचंड सुखावतात. काही दिवसातच गणेशोत्सवाच्या सुट्ट्या लागतील त्यामुळे लहानगे गावात आनंदाने बागडतील व खेळतील. तरुण व मोठे गावाच्या आजूबाजूच्या जंगल व निसर्गाचा आनंद घेतांना दिसतील तर कुणी जुन्या मित्रमंडळींना भेटतील. गावागावात रेलचेल दिसू लागली आहे. गावांना खऱ्या अर्थाने गावपण आले आहे. गावे वाड्या जणूकाही उजळून निघाल्या आहेत. आर्थिक व्यवहारांना देखील गती आली आहे. प्रत्येकजण गणरायाच्या स्वागतासाठी आतुर झालेला दिसत आहे. बाप्पाच्या स्वागताची जिकडेतिकडे जय्यत तयारी सुरू झाली आहे. गणरायाची प्रतिष्ठापना झाल्यावर घराघरात गणराया समोर जागरणे आरत्या होतात. काही वेळेस पत्ते खेळले जातात. मात्र सुधागड तालुक्यातील वावे गावातील तरुण गणरायासमोर व्हॉलीबॉल व इतर स्पर्धा घेतात. तर ग्रंथालयात पुस्तके वाचण्यासाठी तरुण व मुले जमतात. अशा प्रकारे गणेशोत्सवात तरुणाईला विधायक कामात गुंतवले जाते. या उपक्रमामुळे गावातील सर्व तरुण मागील काही वर्षांपासून एकत्र येत आहेत. एकमेकांशी विचार विनिमय करु लागली. तरुणांच्या हातातील मोबाईल सुटले. अनेक व्यसनापासून तरुण दुर गेले. तरुण एकत्र आल्याने दुरावलेली मने जुळून आली. या उपक्रमामुळे गणपतीमध्ये एक नवीन आनंदाची आणि एकात्मतेची ऊर्जा गावात पसरते. गणपती उत्सव लोकमान्य टिळकांनी ज्या हेतुन सुरु केला तो हेतु समाजातून कुठेतरी भरकटत चालला आहे. त्यामुळे सर्व तरुण व ग्रामस्थ एकत्र येणे आणि विधायक समाज घडवणे हा या मागच हेतू आहे असे, केतन म्हसके यांनी सांगितले. लहानग्यांनाच जर पर्यावरण स्नेही व पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्व पटवून दिले तर आपोआपच पुढची पिढी पर्यावरणाप्रती अधिक सजग होईल. या उद्देशानेच लहानग्यांसाठी येथे मातीचे गणपती बनविण्याची कार्यशाळा आयोजित केली जाते, असे तज्ञ मार्गदर्शक नेहा देशमुख आणि अभिषेक देशमुख यांनी सांगितले.

### प्रबोधनात्मक कार्यक्रम

महा अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष मोहन भोईर यांनी सांगितले की, जिल्ह्यात काही ठिकाणी सार्वजनिक व घरगुती गणेशोत्सवात चमत्कार प्रयोग सादरीकरण, सर्पविज्ञान आदी विधायक व प्रबोधनात्मक कार्यक्रम त्या-त्या शाखांमार्फत राबविले जातात. ज्याला चांगला प्रतिसाद मिळतो. यावर्षी देखील असे कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. सुधागड तालुका शाखा कार्याध्यक्ष अमित निंबाळकर यांनी सांगितले की दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गणरायासमोर प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविणार आहोत.

### दुकानदार तयारीत

गणरायाच्या स्वागतासाठी सर्वजण तयारीला लागले आहेत. त्याप्रमाणेच व्यापारी व व्यावसायिकदेखील तयारीत आहेत. गणरायासाठी लागणारी कृत्रिम फुले, हार, सजावटीचे साहित्य अगरबत्ती, धूप आदी वस्तूंची विक्री जोरात सुरु झाली आहे. असे पालीतील सौम्य कलेक्शनचे मालक मुकुंद कोसुंबकर यांनी सांगितले. शिवाय मखर विक्रेतेदेखील सज्ज झाले आहेत. मिठाईवाल्यांनीदेखील कामाला सुरुवात केली आहे. तसेच छोटे मोठे ढोलकी विक्रेतेदेखील विक्रीसाठी ढोलकी घेऊन आले आहेत. साऊंड सिस्टिमवाले देखील तयार आहेत.

## आदिवासी आश्रमशाळेला टिव्ही संच भेट

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

कुष्ठरोग निवारण समिती संचालित अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे आदिवासी शाळेसाठी इनरव्हील क्लब ऑफ मुंबई खार या संस्थेमार्फत शाळेच्या गरजेनुसार टीव्ही संच आणि इन्व्हर्टर देण्यात आला. या प्रसंगी इनरव्हील क्लब ऑफ मुंबई खारच्या क्लब सेक्रेटरी देविका रहेजा, माजी अध्यक्षा यशी चौव्हान, मणीभवन गांधी संग्रहालयाच्या विश्वस्त फाल्गुनी मेहता, कुष्ठरोग निवारण समितीचे प्रमुख कार्यवाह विनायक शिंदे आणि इनरव्हील क्लब ऑफ मुंबई खारच्या मेंबर्स् शाळेतील शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात आश्रमशाळेतील मुलांनी पाहुण्यांचे स्वागत लेझीम व मानवी मनोरे यांनी केले पाहुण्यांना मानवी मनोऱ्याचे फार कौतुक वाटले. कार्यक्रम ठिकाणी सर्वांसाठी शाळेतील मुलांनी एक साथ विशिष्ट प्रकारच्या टाळ्यांनी स्वागत केले.

## तिबोटी खंड्याचे वाचविले प्राण



**। उरण । वार्ताहर ।**

पनवेल मधील करंजाडे येथे कॉलेज फाट्याजवळ असलेल्या तलावात पडलेला 'तिबोटी खंड्या' नावाचा पक्षी आढळून आला. याला इंग्रजीत 'ओरिएंटल ड्वार्फ किंगफिशर' म्हणतात. केअर ऑफ नेचर या निसर्ग सेवी संस्थेचे चिंचपाडा शाखा अध्यक्ष रुपेश पाटील हे सकाळी पोहण्यासाठी तलावात गेले असता आपला जीव वाचविण्यासाठी पाण्यातून बाहेर पडण्याकरिता हालचाली करत असलेला हा असहाय पक्षी त्यांच्या नजरेस पडला. त्यांनी या पक्षाला पाण्यातून काढून लगेचच मकेअर ऑफ नेचर महाराष्ट्र राज्यफ्चे संस्थापक राजू मुंबईकर यांना संपर्क करून ही माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली योग्य ते उपचार करून पक्षी सुस्थितीत झाल्यावर त्याला त्याच ठिकाणी त्यांच्या निसर्ग अधिवासात मुक्त केले.

पश्चिम घाटात रहिवासी असलेला हा 'तिबोटी खंड्या' विणीच्या हंगामात रायगड जिल्ह्यात आलेला पाहायला मिळतो. 'तिबोटी खंड्या' या पक्षाला रायगड जिल्ह्याचा 'जिल्हा पक्षी' म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. विविध रंगाचे अतिशय विलोभनीय असं सौंदर्य प्राप्त असलेला 'तिबोटी खंड्या' दरवर्षी जून ते सप्टेंबर या त्याच्या विणीच्या काळात मोठ्या प्रमाणात कोकणात घरटी करताना पाहायला मिळतो.

याच्या निरिक्षणासाठी कर्नाळा अभयारण्य हे पक्षी प्रेमींचे सर्वात पसतींच्या ठिकाणांपैकी एक महत्त्वाचे ठिकाण मानले जाते. आपल्या पिल्लांना भरविण्यासाठी जंगलातून पाली, लहान खेकडे, बेडूक आदी घेऊन येतानाच क्षण अगदी अनुभव घेण्यासारखे असतात. आणि विणीच्या अशावेळी या पौढ पक्षाला मिळालेलं हे जीवदान खूप महत्त्वाचे मानले जातेय

## नाविक कामगारांचा कौटुंबिक मेळावा

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

सिंधुदुर्गातील सावंतवाडी येथे शिल्पग्राम रिसॉर्ट मध्ये नॅशनल युनियन ऑफ सीफेरर्स ऑफ इंडियाच्या वतीने ३० ऑगस्ट २०२४ रोजी नाविक आणि त्यांच्या कुटुंबियांचा कौटुंबिक मेळावा तसेच सिंधुदुर्गातील नाविकांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी सिनर्जी शिप मॅनेजमेण्ट कंपनीच्या माध्यमातून रोजगार मेळावा आयोजित केला होता.

या कार्यक्रमाला भरपूर गर्दी जमली होती. कारण शेकडो नाविक आणि त्यांचे कुटुंब सहभागी झाले होते. या कार्यक्रमाला सिंधुदुर्गातील नाविक आणि त्यांच्या कुटुंबियांचा चांगला सहभाग मिळाला.

## विजेच्या लपंडावामुळे कंपनीवर स्थलांतराची वेळ

**। तळा । वार्ताहर ।**

तालुक्यातील कासेवाडी येथील मांदाड रोड येथे अत्याधुनिक परम फुडस् अन्ड बेवरेज या फील्टर वॉटर कंपनी सुरू झाली. मागील तीन वर्षात या कंपनीने रायगड जिल्ह्यासह मुंबई ,ठाणे उपनगरात उत्तम दर्जाची सेवा आणि पाण्याच्या क्वालिटीमुळे नाव कमविले. अनेक पारितोषिक या कंपनीला मिळाली आहेत. या कंपनीमध्ये स्थानिकांना रोजगार मिळाला आहे. परंतु आजच्या घडीला महावितरणच्या गलथान कारभारामुळे या कंपनीवर स्थलांतराची वेळ आली आहे.

तळा तालुक्यातील वीजपुरवठा दररोज खंडित होत आहे. त्यामुळे उद्योगनगरीमधील विजेचा लपंडाव सुरू असून व्यवसायिक व नागरिक हैराण झाले आहेत. याचा परिणाम व्यवसायावर होत आहे. मंगळवारी देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली वीज पुरवठा बंद असतो आणि इतर दिवशी विजेचा लपंडाव सुरू असल्याने या कंपनीला त्याचा मोठा फटका बसत असून आर्थिक नुकसान दिवसेंदिवस वाढत आहे.

पीटसई येथे एक्कल कंपनी असून या कंपनीमध्ये मोठ्या प्रमाणात विविध उत्पादन सुरू असते. सकाळी मशीन सुरू केल्यावर मशीनच्या तापमानाचा समतोल साधेपर्यंत वेळ जातो आणि त्यात लाईट गेल्यावर पुन्हा तापमानाचा समतोल साधायला वेळ जातो आणि तिथून पुढे काम सुरू केले जाते. कंपनीमधील कर्मचारी वेळेत आले तरी दिवसाचे ठरलेले उत्पादन पूर्ण करायला वेळ लागतो. उत्पादन वेळेत न झाल्यास त्याचा परिणाम तोटा सहन करावा लागतो.

> वीज पुरवठा अनियमित असल्याने उत्पादनाच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे ऑर्डर पूर्ण करताना खूप अडचणी येतात. पॅकेजिंग कामात वीज हा खूप महत्त्वाचा भाग आहे. जनरेटरवर मोठ्या मशीन वापरता येत नाहीत. विजेच्या लपंडावामुळे आर्थिक नुकसानीत अजून भर पडत आहे.अशीच सेवा जर मिळत राहिली तर कंपनीला स्थलांतर व्हावे लागेल.
>
> – पांडुरंग महाडिक
> एक्कल कंपनी मालक/संचालक.

> मला येथे रुजू होऊन आज आठ दिवस झाले आहेत म झ्याकडून अखंडित वीज पुरवठा देण्यासाठी प्रयत्न करणार आहे.
>
> –सुरेश घावरे, उपकार्यकारी अभियंता तळा तालुका

महावितरण कंपनी सुरळीत सेवा देत नसल्याने मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहेत विजेच्या लपंडवामुळे वेळेचे गणित जुळवून काम करणे जिकरीचे झाले आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना तसेच बसून राहावे लागते. ज्या मशीनचे तापमान समतोल व्हायला वेळ लागतो अशा मशीन दिवसभर बंद ठेवाव्या लागतात.सध्या वीज पुरवठा अनियमित असल्याने उत्पादनाच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे ऑर्डर पूर्ण करताना खूप अडचणी येतात. असे पांडुरंग महाडिक यांनी सांगितले.

महावितरणच्या गलथान कारभारामुळे कंपनीला स्थलांतर करण्याची वेळ आली आहे बाजारातील दूध, डेअरी, आइस्क्रीम पार्लरचे व्यावसायिक बंद होण्याच्या मार्गावर आहेत. या संदर्भात महावितरण उपकार्यकारी अभियंता सुरेश घेवारे यांच्याकडे संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, मला येथे रुजू होऊन आज आठ दिवस झाले माझ्याकडून अखंडित वीज पुरवठा देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

### 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियान

## माथेरान प्राथमिक शाळा प्रथम



**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरान नगरपरिषदेच्या वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळेने मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानात प्रथम क्रमांक पटकावला असून तालुक्यातील एकूण २९७ शाळांनी या अभियानात सहभाग नोंदवला होता.

स्वच्छता, शिस्तबद्ध वागणूक, विद्यार्थ्यांचा सहभाग आणि शाळेच्या गुणवत्तेच्या आधारावर माथेरानच्या प्राथमिक शाळेने तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला असून तीन लाख रुपयांच्या बक्षीसाची मानकरी ठरली आहे. याकामी शाळेच्या व्यवस्थापन समिती अध्यक्षा ज्योती शिंदे, मुख्याध्यापक दिलीप आहिरे, शिक्षक सचिन भोईर, अनिश पाटील, संतोष चाटसे, साक्षी कदम, निकिता चव्हाण, मनिषा चौधरी , किरण शिंदे, नगरपरिषदेच्या अभियंत्या करुणा बांगर, लेखापाल अंकुश इचके आदींचे विशेष सहकार्य लाभले.

> नगरपरिषदेचे उत्तम प्रशासक तथा कार्यक्षम मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अभियानात आम्ही सहभाग घेतला. सर्व शिक्षक, पालक आणि सामाजिक संघटना यांनी या करीता मोलाचे योगदान दिले आहे. यापुढे गुणवत्ता पूर्ण शिक्षण आणि भविष्यवेधी शिक्षण हे आमचे अंतिम उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहे.
>
> – दिलीप आहिरे, मुख्याध्यापक,
> प्राथमिक शाळा माथेरान

## गणपतीचे साहित्य महागलेलेच

**। पनवेल । वार्ताहर ।**

गणेशोत्सवात गणेशमूर्तीसह सजावटीचे सर्वच साहित्य महाग झाले आहेत. त्यामुळे नागरिकांना महागाईच्या झळा सहन कराव्या लागत आहेत. उत्सवासाठी लागणाऱ्या सजावटीच्या साहित्यापासून ते पूजेच्या साहित्यापर्यंत सर्वच वस्तूंच्या दरांत मोठी वाढ झाली आहे. सजावटीचे साहित्य २० टक्क्यांनी आणि पूजेचे साहित्य ३० टक्क्यांनी महागले आहे, अशी माहिती विक्रेत्यांकडून देण्यात आली.अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवासाठी बाजारपेठाही सज्ज झाल्या आहेत. बाजारपेठेत नागरिकांची खरेदीसाठी गर्दी होत आहे.

## सजावटीसाठी प्लास्टिक फुलांना मागणी

**। पनवेल । वार्ताहर ।**



सर्वांच्याच लाडक्या गणपती बाप्पांचे आगमन पाच दिवसांवर येऊन ठेपले आहे. त्यामुळे बाप्पांच्या स्वागताची जय्यत तयारी सुरु असून, यंदा गणरायाची आरास करताना अनेकांनी प्लास्टिक फुलांच्या माळांना पसंती दिली आहे. या रंगीबेरंगी कृत्रिम फुलांच्या माळांची अनेकांना भुरळ पडत असून, यंदा मखरांकडे गणेशभक्तांनी पाठ फिरवल्याचे चित्र आहे.

गणपतीच्या हटके मखराचे पर्याय शोधणाऱ्या गणेशभक्तांचे लक्ष या कृत्रिम फुलांकडे आकर्षित होत आहे. तर दुसरीकडे पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने सजावट करताना इकोफ्रेंडली मखराला प्राधान्य द्यायला हवे, तसेच सण झाल्यावर त्याचे पावित्र्यही जपणे गरजेचे असल्याचे पर्यावरणप्रेमींचे म्हणणे आहे. दरवर्षी गणरायाच्या आगमनापूर्वी बाजारपेठ मखराच्या विविध साहित्यांनी बहरून जाते. गणरायासाठी आरास करण्यासाठी फुलांचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो.


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **वाडगाव येथे कॉटेज** सांभाळण्याकरिता व्यक्ती पाहिजे. संपर्क-९७६२७७७९७५.
- व्यावसायिक गाळा भाड्याने देणे आहे कारपेट एरिया 750 Sq Foot संपर्क ९४२२५९४०३३/८३०८३२१६२६ ठिकाण - मिरची गल्ली अलिबाग.
- **ऑनलाईन प्रवेश सुरु आहे.** अंगणवाडी शिक्षिका, सुपरवइझर, समाजसेवक, पत्रकार इत्यादी कोर्स प्रवेश देणे सुरु आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा ९०२९२९४८३८/९५१८५६५५१६
- **संकुल सहकारी गृहनिर्माण संस्था,** पिंपळभाट-अलिबाग यांना सेक्युरिटीची आवश्यकता आहे. तरी इच्छुक सेक्युरिटी एजन्सीजनी कोटेशन पाठवावे. संपर्क : शरद भोईर ९०२८५७८०३०
- **कॅन्टीनसाठी अनुभवी सुपरवायजर पाहिजे.** अलिबाग येथे कॅन्टीनमध्ये राहणारा पाहिजे. संपर्क : ९२२४४४९९४१ वायोडाटा व्हाटस्अप वर पाठवणे.
- **विकणे आहे.** ६३५ SQ.ft चा १BHK Flat पोयनाड एस.टी. थांब्यापासून ५ मिनिटांच्या अंतरावर Contact 8452054720

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


### पथकांची गणेशोत्सवाची जय्यत तयारी अंतिम टप्प्यात

# टीपेला पोहोचला ढोल-ताशांचा सराव

**। पनवेल । वार्ताहर**

यंदा गणेशोत्सव कोणत्याही निर्बंधाशिवाय मोठ्या उत्साहात जोरदार साजरा करण्यात येणार आहे. त्यामुळे उत्सवात ढोल-ताशाचा दणदणाट पाहायला मिळणार आहे. दरम्यान, गणेशोत्सव जवळ आल्याने ढोल-ताशा पथकांचा सराव अंतिम टप्प्यात आला आहे. ताल व लयबद्ध वादनाने ही पथके सगळ्यांनाच थिरकायला लावत आहेत. पनवेल परिसरातील अनेक ठिकाणी असलेल्या उड्डाणपुलाखाली अनेक ठिकाणी चौकाचौकांत मोकळ्या जागेवर ढोल-ताशा पथकांचा जोरदार सराव सुरू आहे.



सध्या गणपतीसाठी नवीन लय, ठेका व ताल शिकण्यासाठी बहुतांश ढोल-ताशा पथकातील तरुणाई सध्या सरावातून मेहनत घेत आहे. गणेश उत्सवानिमित्त जवळपास दीड महिना आधीपासून सराव सुरू आहे. नियमित पथकातील सदस्यांचा दिनक्रम पूर्ण करून सायंकाळी सहा ते नऊ या वेळेस सराव चालतो, पथकात साधारण आठ वर्षे वयोगटापासून ते ४५ वर्ष वयोगटापेक्षा शंभर ते दोनशेपेक्षा अधिक सदस्यांचा सहभाग असतो. काही पथक सदस्याकडून शुल्क घेतात, तर काही घेत नाहीत, सध्या तरुणाईचा ढोल-ताशा मंडळांमध्ये सहभाग होण्यासाठी मोठा उत्साह दिसत आहे. यासाठी मुलाखतही घेतली जाते, यात एक ते पाच असे पारंपरिक ताल असतात. याला पारंपरिक हात चालवण असे संबोधले जाते. मिरवणुकीमध्ये सहभागी भक्तांना आनंद मिळेल अशा ठेक्यांना अधिक पसंती मिळत आहे. गणपती निमित्त जवळपास दिड महिना आधीपासून सराव सुरु होतो. बहुतांश पथकांचा सायंकाळी ५ ते ८ या वेळेत जंगी सरवा चालतो. पथकात साधारण ८ ते ९ वयोगटापासून ४५ वर्षे वयोगटाचे सदस्य असतात. शेकडो सदस्य प्रशिक्षित झाले आहेत. सदस्यांना सरावासाठी नियमित हजर राहून मेहनत घ्यावी लागते. काही पथक सदस्यांकडून शुल्क घेतात तर काही घेत नाहीत. बहुतांश ढोल पथक आपला नवीन ठेका व ताल यांचा वेगळेपणा जपण्याचा प्रयत्न करतात. यात १ ते ५ असे पारंपारिक ताल असतात. याला पारंपारिक हात चालवणे असेही म्हटले जाते. लोक आनंदी होऊन डोलू व नाचू लागतील अशा ठेक्यांना अधिक पसंती मिळते. सध्या गणेशोत्सव, नवरात्रोत्सव सार्वजनिक मिरवणूक, जयंती मिरवणूक, पाडवा अशा विविध सणांना ढोल-ताशा पथकांची मागणी आहे. प्रत्येक ढोल-ताशा पथकाचे स्वतःचे काही नियम आहेत.

> **गणपती निमित्त जवळपास दिड महिना आधीपासून सराव सुरु होतो. बहुतांश पथकांचा सायंकाळी ५ ते ८ या वेळेत जंगी सरवा चालतो. पथकात साधारण ८ ते ९ वयोगटापासून ४५ वर्षे वयोगटाचे सदस्य असतात. शेकडो सदस्य प्रशिक्षित झाले आहेत. सदस्यांना सरावासाठी नियमित हजर राहून मेहनत घ्यावी लागते.**

# विजेच्या अनियमिततेमुळे नागरिक हैराण

। माथेरान । वार्ताहर ।

मागील आठ दिवसांपासून माथेरानमध्ये सतत वीज जाण्याचे प्रकार वाढल्याने येथील स्थानिक व्यावसायिक व आलेले पर्यटक हैराण झाले असूंन, कमी दाबाने व सातत्याने वीज जाण्यामुळे अनेकांच्या इलेक्ट्रिक वस्तूदेखील खराब झाल्या आहेत.

महावितरणकडून मात्र सततच्या वीज जाण्याने काहीही स्पष्टीकरण मात्र होताना दिसत नाही. वीज गायब झाल्यानंतर नागरिकांना कोणत्याही सूचना मिळत नाहीत, वीज पुन्हा केव्हा सुरू होईल याची कोणतीही माहिती उपलब्ध होत नाही, त्यामुळे व्यावसायिकांमध्ये रोषाचे वातावरण आहे. आताही येथे सतत वीज जात आहे. ही वीज जेव्हा परत येते, तेव्हा एक तर कमी दाबाने वीजपुरवठा होत असतो किंवा फेज गायब असतात, त्यामुळे अनेकांचे टीव्ही, फ्रिज, इन्व्हेटर, एसी खराब होण्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ झाली आहे. माथेरानमध्ये नव्याने बदली होऊन आलेले विद्युत अभियंता यांना येथील स्थानिक प्रश्न माहीत नाही; परंतु तरीही त्यांनी माथेरानमधील प्रश्न अवगत करून त्यावर लवकरच तोडगा काढण्याचे सांगितले असून, नेरळ-माथेरान घाटामध्ये सातत्याने बिघाड होत असल्याने त्यावर उपाययोजना करू, असे सांगितले आहे.

नेरळ, कडाव येथील कळंबोली फिडर येथून माथेरानला वीजपुरवठा केला जातो व या मार्गावर अनेक गावांनाही वीज दिली गेली आहे. या गावांमध्ये या मार्गावर काही बिघाड झाल्यास माथेरानची ही वीज गायब होत असते, त्यामुळेच माथेरान पर्यटन दर्जा पाहता माथेरानकरिता एक वेगळी वीज वाहिनी असावी, अशी मागणी स्थानिकांकडून अनेक वर्षांपासून होत आहे.

**नेरळ (कळंबोली) येथील वीज केंद्रातून माथेरानला वीजपुरवठा केला जातो, परंतु नेरळ येथे काही तांत्रिक बिघाड झाल्यास त्याचप्रमाणे पावसामुळे घाटात वीजवाहिनीवर झाडे उन्मळून पडल्यास वीजपुरवठा खंडित होत असतो.**

**– संतोष पादिर, सहाय्यक अभियंता, महावितरण**

---

## Public Notice
### Loss of Registration Receipt

This is to inform the General Public at large that I, Mr. Rhusin Ashwin Savani, have lost the original registration receipt with respect to the Sale Deed dated 15th March, 1995 and registered on 24th April 2006 for the Flat No. B-707 in Narendra Park CHS, CS Road, Anand Nagar, Dahisar (E), Mumbai 400068. I have also registered an FIR (FIR No. 2029/24) with the Dahisar Police station

Any person/s coming in possession of the above document, is requested to contact me at the below mentioned address:

F/4, 1ST Floor , Bhagyodaya CHS, Sicka Nagar, V P Road, Mumbai 400004.

Dated This 03rd day of September, 2024.

---

दिनांक : ०३/०९/२०२४

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की खालीलप्रमाणे नमुद केलेली मिळकत ही आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रकाश विनायक भगत यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कामथ, ता. अलिबाग | ४९६ | क्षेत्र ०-०९-६०<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकूण क्षेत्र ०-११-१० | २.४४ |

दिनांक :- ०३/०९/२०२४

**अॅड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

---

## शुद्धीपत्रक

दै.कृषीवल रायगड आवृत्तीत दि.३० ऑगस्ट २०२४ रोजीच्या पृष्ठ क्र.२ वर प्रसिद्ध झालेल्या मा.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर अलिबाग रायगड या जाहीर नोटीसीमध्ये प्यारा क्र.२ मधील दि. २५/०२/२०२४ ऐवजी दि.२५/०९/२०२४ असे वाचण्यात यावे.

---

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

### ई-निविदा आमंत्रित करण्याची सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने, उप मुख्य अभियंता (काम), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, खालील कामासाठी पात्र कंत्राटदारांकडून आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदाद्वारे ओपन टेंडर सिंगल पॅकेट बिड सिस्टम आमंत्रित करतात: **कार्य नाव:** कोकण रेल्वेवरील कणकवली स्थानकावरील उच्चस्तरीय प्लॅटफॉर्मचा विस्तार. **निविदा सूचना क्रमांक:** केआर-आरएन-डीवाईसीईडब्ल्यू-पीएफकेकेडब्ल्यू-2024-09 दिनांक: 03.09.2024; **एकूण अंदाजित किंमत:** ₹ 51,74,738/- (जीएसटी वगळून). **बोली सुरू होण्याची तारीख:** 10/09/2024. **शेवटची तारीख /वेळ:** 25/09/2024 15:00 तासांपर्यंत ऑनलाइन ऑफर/बिड सबमिट करण्यासाठी. **पूर्ण कालावधी:** पावसाळ्यासह 3 महिने. मॅन्युअल ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत. कृपया तपशील / सहभागासाठी **https://www.ireps.gov.in** वेबसाइटला भेट द्या आणि शुद्धीपत्र/परिशिष्ट फक्त या वेबसाइटवर होस्ट केले जातील.

---

## शासकीय तंत्रनिकेतन पेण
**रामवाडी शिवाजीनगर पेण, जि.रायगड**
**(०२१४३-२९९१८८)**
e-mail : office. gppen@dtemaharashtra.gov.in,
principal.gppen@dtemaharashtra.gov.in

**प्रथम व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका**
**प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२४-२५**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्रथम व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तिसऱ्या (CAP 3) फेरी नंतर शासकीय तंत्रनिकेतन पेण, येथे रिक्त राहणाऱ्या जागा संस्थास्तरावर भरण्याचे नियोजित करण्यात आलेले आहे. माहिती पुस्तिका पदविका प्रवेश २०२४-२५ नियम क्रमांक १३ अन्वये सदरची प्रवेश प्रक्रिया शासकीय तंत्रनिकेतन पेण, या संस्थेत दि. ०५-०९-२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून सुरु करण्यात येणार आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी सर्व मुळ कागदपत्रे व आवश्यक शुल्काची रक्कम घेवून संस्थेत ठीक १० वाजता उपस्थित रहावे. अधिक माहितीसाठी संस्थेची वेबसाईट www.gppen.ac.in ला भेट द्यावी.

**प्र. प्राचार्य**
**शासकीय तंत्रनिकेतन, पेण**

---

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे बामणसुरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक १०३ एकूण क्षेत्र ०-४४-८० हे. आर. आकार १०.८७ रु.पै. पैकी ०.२२.४० हे.आर, आकार ५.४४ ही भातशेती मिळकत श्री. मधुकर गणपत काठे यांचे नावे ७/१२ चे दप्तरी दाखल असून सदर मिळकती संदर्भात खरेदी- विक्रीचा व्यवहार आमच्या अशिलांबरोबर करण्याचा ठरविलेला आहे. त्या अनुषंगाने त्यांच्यामध्ये बोलणी झालेली आहे. सदर मिळकतीची मालकी व ताबेकब्जा श्री. मधुकर गणपत काठे यांचा आहे असे त्यांनी दाखविलेल्या कागदपत्रावरून दिसून येत आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा भरवसा विद्यामान मालक यांनी दिलेला आहे.

तरी सदर मितीच्या संदर्भात कोणाचीही, गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्वेध असून खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक :- ०२/०९/२०२४
भोगवटा धारकांचे नाव
श्री. मधुकर गणपत काठे

सही/-
**अॅड. श्री. सचिन वा. जोशी**
दुसरा मजला, फ्लॅट नं. ३.
साईलिला सोसायटी, डॉ. कुमठेकर हॉस्पीटल शेजारी.
श्रीबाग नं. २, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड
मोबाईल - ९८२२६५३६५५

---

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

---


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


---

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.१४४/२०२४

**मे तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. चंद्रकांत धर्माजी गायकवाड
वय : ६७ वर्षे, धंदा शेती,
सध्याचा पत्ता :- सिमला नगर,
डीएक्स-७३-१/२, नेपेअन सी रोड,
सिमला नगर पोलीस चौकी जवळ, — अर्जदार
मलबार हिल, मुंबई, कंबाला हिल,
मुंबई- ४०००२६
कायमचा पत्ता : रा. निळगुण,
ता. माणगांव, जि. रायगड.

विरुध्द

५. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत देगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.
६. गटविकास अधिकारी सो., — सामनेवाला
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. चंद्रकांत धर्माजी गायकवाड यांची आई कै. गौरी धर्मा गायकवाड ही दि. २३/१२/२०१३ रोजी मौजे निळगुण, ता. माणगांव, जि. रायगड. येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना जावक क्र. ११२/२०२४ ने दि. २६/०८/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची आई कै. गौरी धर्मा गायकवाड ही दि. २३/१२/२०१३ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता २१ दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. चंद्रकांत धर्माजी गायकवाड यांची आई कै. गौरी धर्मा गायकवाड ही दि. २३/१२/२०१३ रोजी मौजे निळगुण, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव :
ता: ३०/०८/२०२४ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

---

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे मिळकतीचे वर्णनः- तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका उरण रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती उरण येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकत :-

**मौजे :- बेलोंडाखार ता:-उरण, जि:-रायगड**

| सर्व्हे नं | शेतकऱ्यांचे नांव | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| ६०/५ | अभिजीत प्रमोद विरकुड व इतर | ०.०६.३० | ०.८७ |

वर नमुद केलेली मिळकत ही वरील कबजेदाराच्या मालकी हक्कांत व कबजे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबदल विद्यमान मालकांने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कोणचाही, कोणताही कसलाही कुळ वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनविडी, साठेकरार, खरेदीखत, कुळमुखत्यार पत्र, विकसीत करण्याबाबतचा करार, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्टगेज, संपादन भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्त्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण:-उरण
दिनांक:- ०२/०९/२०२४

सही/-
**अॅड. उमेश लक्ष्मण शिंदे**
मो. ९८२०६२६९००
ऑफिस पत्ता शॉप नं. ९०५-९०८, शेल्टॉन क्युंबीक्स, प्लॉट नं ८७, सेक्टर १५, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई ४००६१४.

---

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.१४५/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. बारकु पांडु शिंदे
वय ७९ वर्षे, चंदा शेती.
कायमचा पत्ता : रा. अंबलें, कातलाचा कोंड — अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड.
सध्याचा पत्ता: दिवाण ॲण्ड शह जवळ,
वालीव फाटा, सातीवली, ठाणे, वसई पूर्व,
महाराष्ट्र, ४०१२०८

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत अंबलें — सामनेवाला
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. बारकु पांडु शिंदे यांचे भाऊ कै. दत्ताराम महादेव शिंदे हे दि. ०७/०५/१९७० रोजी मौजे अंबले- कातळाचा कोंड, ता. माणगांव, जि. रायगड. येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. १८/०४/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे भाऊ कै. दत्ताराम महादेव शिंदे हे दि. ०७/०५/१९७० रोजी मयत झाले असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरीच जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. बारकु पांडु शिंदे यांचे भाऊ कै. दत्ताराम महादेव शिंदे हे दि. ०७/०५/१९७० रोजी मौजे अंबलें-कातळाचा कोंड, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. :३०/०८/ २०२४ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

---

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल ड्रिम्झ् प्लॅनेट तर्फे प्रोप्रायटर सरफराज मकबुल शेख यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तीचे मालक १. श्री. राजेंद्र विश्राम जैसवार व २. श्री. सुरेशलाल शाम बिहारी जैसवार यांचेकडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. ममदापुर, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नंबर | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ.मी. ) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| १५१ | १ | ४२५-०० | ४२-५० |

तरी वर वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **चौदा दिवसांचे** आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. ०३/०९/२०२४.

**अॅड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता - शॉप न. १२, शिवगंगा अपार्टमेंन्ट,
ब्राम्हणआळी, नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड. मो. - ९३२५०६००३७.

---

दि. ०२-०९-२०२४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की,

खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालक मंदार काशिनाथ पाटील व इतर यांनी सदर नोटीस नमूद मिळकती आमचे अशिलांना नोंदणीकृत दस्ताने विक्री करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | मौजे | गट क्र. व उपविभाग | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| १. | महाळूंगे खुर्द, ता. मुरुड | ११९ | ०-४५-०० | ०-४६ |
| २. | महाळूंगे खुर्द, ता. मुरुड | १२३/२ | ०-८६-९० | ०-५५ |

वरील नमूद संपूर्ण जमिन मिळकती निर्वेध असल्याचा निर्वाळा करुन घेण्याकरीता सदरची नोटीस देण्यांत येत आहे. तरी देखील या मिळकतींमध्ये इतर कोणाचेही गहाण, दान, लिज, फरोक्त, भागीदार, बक्षिस, मृत्युपत्रांकित दान, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगीहक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतींबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालू असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी स्वरुपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी. या मुदतीमध्ये कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकती निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून नमूद मिळकतींचे विद्यमान मालक हे सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागावून येणाऱ्या हरकती विद्यमान मालक तसेच मिळकती खरेदी करणार यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**अॅड. मोहीनेश मनोहर ठाकूर**
मोबा. नं. ७०५७९०६८१८/८०८००१९११५
(रा. चिंचघर, पो. बोर्ली, ता. मुरुड, जि. रायगड)
ई मेल mohineshthakur1234@gmail.com

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

ज.म.र अर्ज/१७६/२०२४

**जाहीर नोटीस**

प्रति,
श्री. अब्बास रफीक सिध्दीक — अर्जदार
रा. मु.पो. राजपुरी, ता.मुरुड, जि. रायगड
विरुध्द
ग्रुप ग्रामपंचायत राजपुरी
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहीर नोटीसद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अब्बास रफीक सिध्दीक अर्जदार यांच्या आजोबांचा मृत्यू दि. ०६/०८/१९७५ रोजी मौजे राजपूरी, ता. मुरुड, जि. रायगड येथे झालेला असून त्यांच्या मृत्यूची नोंद राजपुरी, यांचा जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे मृत्यू नोंदीचे आदेश मिळणेकरिता मुरुड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/ मॅरेज ॲन्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अब्बास रफीक सिध्दीक यांच्या आजोबांचा दि. ०६/०८/१९७५ रोजी मृत्यू झाल्याबाबत कोणाची ही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयात दि. १२/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार श्री. अब्बास रफीक सिध्दीक ह्यांच्या आजोबांची जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये मृत्यूची नोंद होणेकरिता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.३०/८/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे,

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

ज.म.र अर्ज/१७५/२०२४

**जाहीर नोटीस**

प्रति,
श्री. अब्बास रफीक सिध्दीक — अर्जदार
रा. मु.पो. राजपुरी, ता.मुरुड, जि. रायगड
विरुध्द
ग्रुप ग्रामपंचायत राजपुरी
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहीर नोटीसद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अब्बास रफीक सिध्दीक अर्जदार यांच्या आजीचा मृत्यू दि. १५/०४/१९७९ रोजी मौजे राजपूरी, ता. मुरुड, जि. रायगड येथे झालेला असून त्यांच्या मृत्यूची नोंद राजपुरी, यांचा जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे मृत्यू नोंदीचे आदेश मिळणेकरिता मुरुड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/ मॅरेज ॲन्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अब्बास रफीक सिध्दीक यांच्या आजीचा दि. १५/०४/१९७९ रोजी मृत्यू झाल्याबाबत कोणाची ही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयात दि. १२/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार श्री. अब्बास रफीक सिध्दीक ह्यांच्या आजीची जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये मृत्यूची नोंद होणेकरिता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.३०/८/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे,

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

ज.म.र अर्ज/१७४/२०२४

**जाहीर नोटीस**

प्रति,
श्री. किरण भालचंद्र पाटील — अर्जदार
रा. मु.पो. विहुर ता.मुरुड, जि. रायगड
विरुध्द
ग्रुप ग्रामपंचायत विहूर
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहीर नोटीसद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त श्री.किरण भालचंद्र पाटील अर्जदार यांच्या जन्म दि. ०१/०१/१९७९ रोजी ग्रुप ग्रामपंचायत विहुर येथील मौजे विहूर, ता. मुरुड, जि. रायगड या हद्दीत झालेला असून त्यांच्या जन्माची नोंद विहूर, यांचा जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरिता मुरुड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/ मॅरेज ॲन्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी श्री. किरण भालचंद्र पाटील यांच्या दि. ०१/०१/१९७९ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाची ही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे.न्यायालयात दि.१२/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार श्री. किरण भालचंद्र पाटील ह्यांची जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये मृत्यूची नोंद होणेकरिता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.३०/८/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे,

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

---

दि. ३१/०८/२०२४

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते कि, मौजे-वाळवटी (खुर्द) ता. श्रीवर्धन, जिल्हा-रायगड. येथील मे एलीमेंट लर्निंग सेंटर प्रा.लि. तर्फे अमर विनायक पाटसकर यांचे मालकी हक्काच्या खालील वर्णनाच्या जमिन मिळकती आमचे आशिल श्री अभिशेख जवेरी यांनी कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले असून या मिळकतीत इतर कोणाचा काही हक्क हितसंबंध, गहाण, तारण, लिज, पोडगी, निवाडा, भाडेपट्टा अगर अन्य प्रकार हक्क हितसंबंध असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात अॅड. डि. आर. उफाळे. यांचेकडे लेखी कागदोपत्री पुराव्यासह हरकती दाखल कराव्यात. या मुदतीत हरकती न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून या मिळकतीबाबत पुढील व्यवहार केले जातील व त्याप्रसंगी कसलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. याकरीता जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे.

**मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,**
**वाळवटी (खुर्द) ता. श्रीवर्धन, जिल्हा-रायगड. येथील मिळकती.**

| Sr.No | Serve / Gat No. | Area. H.Ar. | Aakar.Rs |
|---|---|---|---|
| 1 | 227 | 1.69.20 | 9.94 |
| 2 | 284 | 0.19.00 | 3.56 |
| 3 | 282 | 0.32.80 | 5.73 |
| 4 | 283 | 0.19.20 | 4.12 |
| 5 | 231 | 0.41.70 | 7.94 |
| 6 | 229 | 0.47.50 | 5.49 |
| 7 | 133 | 0.24.00 | 0.06 |
| 8 | 56 | 0.23.00 | 0.06 |

दिनांक - ३१-०८-२०२४

**सही/-**
**वकील. श्री.डी.आर. उफाळे**
**मो.नं.९५९४३३६१११/९३२४३१३७७७**
**कार्यालय- परमार कॉम्पलॅक्स, शॉप नं. ०१**
**ता. सुधागड, जि. रायगड. पि.नं.४१०२०५**

---

## जाहीर नोटीस

ग्रुप ग्रामपंचायत कोंदिवडे, ता-कर्जत, जि-रायगड हद्दीतील मौजे कोंदिवडे येथील निर्मला नामदेव गायकवाड यांचे नावे असलेले घर क्र १४८ जना स्मॉल बँक फायनान्स लि यांनी लिलावाद्वारे जावेद अब्दुल मजिद पटेल रा. ५१६ अटलान्टा इस्टेट, इटभटटी गोरेगाव इस्ट, मुंबई ४०००९७ यांना विक्री केली आहे सदर घर क्र १४८ जावेद अब्दुल मजिद पटेल यांचे नावे करणेबाबत अर्ज ग्रामपंचायतीस प्राप्त झालेला आहे. तरी सदर घर क्र १४८ या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाच्या अगर संस्थेच्या साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज वैगरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबधीत व्यक्ति किंवा संस्थानी आपली हरकत पुरव्यासह लेखी स्वरुपात खालील पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात कळवावे वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यानी जावेद अब्दुल मजिद पटेल यांच्या लाभात सोडून दिलेला आहे असे समजून ग्रुप ग्रामपंचायत कोंदिवडे, सदर घर क्र १४८ जावेद अब्दुल मजिद पटेल यांचे नावे करतील व त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास ती ग्रुप ग्रामपंचायत कोंदिवडे, ता - कर्जत, जि - रायगड यांचेवर बंधनकारक राहणार नाही यांची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
दि.०३/०९/२०२४

**सरपंच/ ग्रामविकास अधिकारी**
मौजे कोंदिवडे, ग्रुप ग्रामपंचायत कोंदिवडे,
ता-कर्जत, जि-रायगड ४१०२०१

---

## ग्रामपंचायत कोतवाल खुर्द
## ता.पोलादपूर, जि.रायगड

ग्रामपंचायत कोतवाल खुर्द ता.पोलादपूर जि.रायगड मध्ये सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ तसेच २०२३-२०२४ मधील १५ व्या वित्त आयोग अंतर्गत करावयाच्या विविध विकास कामांची निविदा सूचना खालील प्रमाणे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निधिचे नाव | अंदाजित रक्कम | सन | निविदा सादर अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १) | वैयक्तिक नळ कनेक्शन जोडणी | १५ वा वित्त आयोग | ३४८९५/- | २०२०-२१ | १०/९/२०२४ |
| २) | वैयक्तिक नळ कनेक्शन जोडणी | १५ वा वित्त आयोग | ३४८९५/- | २०२१-२२ | १०/९/२०२४ |
| ३) | बौद्धवाडी समाज मंदिर रंगरंगोटी करणे | १५ वा वित्त आयोग | ८२१७/- | २०२२-२३ | १०/९/२०२४ |
| ४) | ग्रामपंचायत कार्यालय संरक्षण भिंत बांधणे | १५ वा वित्त आयोग | ९८६०४/- | २०२२-२३ | १०/९/२०२४ |
| ५) | रेवाडी बंधिस्त गटार बांधणे | १५ वा वित्त | ९२०४८/- | २०२३-२४ | १०/९/२०२४ |

**अटी व शर्ती**

१) कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. फी भरल्यास अंदाजपत्रक देण्यात येईल.
२) प्राप्त निविदा व दरपत्रक दिनांक १३/९/२०२४ रोजी दु. २:०० वा. ग्रा.पं. कार्यालयात उपस्थितांकडून मा. सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येईल.
३) नोंदणीकृत ठेकेदारास प्राधान्य देण्यात येईल. नोंदणीकृत असल्याचे पुरावे जोडावे.
४) सुरक्षा अनामत रक्कम देयकातून कपात केली जाईल. प्रत्येक देयकातून शासन नियमाप्रमाणे आयकर उपकरांची व इतर करांची कपात केली जाईल.
५) अनामत रक्कम कामांचा दर्जा पाहून काम पूर्ण झाल्यानंतर परत केली जाईल.
६) कोणत्याही एक अथवा अनेक निविदा व दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार ग्रा.पं. ने राखून ठेवला आहे.
७) तांत्रिक लखोट्यासह बंद लिफाफ्यात निविदा सादर करावी.
८) सविस्तर अटी व शर्ती करीता ग्रा.पं. कोतवाल खुर्द कडे संपर्क करावा.

सही/-
**सरपंच**
**ग्रामपंचायत कोतवाल खुर्द**
**ता. पोलादपूर, जि. रायगड**

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कोतवाल खुर्द**
**ता. पोलादपूर, जि. रायगड**

निवडक

## सुमित नागलची माघार

**नवी दिल्ली :** भारताच्या सर्वोच्च मानांकित टेनिसपटू सुमित नागलने डेव्हिस कप स्पर्धेतील स्वीडनविरुद्धच्या सामन्यातून माघार घेतली आहे. त्याने पाठीच्या दुखापतीच्या समस्येमुळे माघार घेतली आहे. सुमितने सोशल मिडीयावर पोस्ट शेअर करत स्पष्टीकरण दिले आहे. सुमितने सांगितले की, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मी या स्पर्धेतून माघार घेतली आहे. नुकतेच यूएस ओपनच्या पहिल्याच फेरीत सुमितला पराभव पत्करावा लागला होता. या पराभवानंतर सुमितला पुनरागमन करायचे होते. परंतु, पाठीच्या समस्येमुळे सुमितची ही इच्छा अपूर्ण रहाणार आहे.

## 'निवड झाल्याने आनंदी'

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आगामी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या १९ वर्षांखालील मालिकेसाठी भारतीय संघाची निवड केली आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारताच्या संघात निवड करण्यात आली आहे. आता त्याने १९ वर्षांखालील भारतीय संघात निवड झाल्यानंतर त्याची प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी बोलताना तो म्हणाला की, सर्वात पहिली गोष्ट म्हणजे माझी निवड झाल्याबद्दल मी खूप आनंदी आहे. तुम्ही सर्वांनी दिलेल्या शुभेच्छांबद्दल आभार. मला खूप मस्त वाटत आहे. मी या क्षणासाठी खूप वाट पाहिली होती.

## एका डावात १९ षटकार

**नवी दिल्ली :** दिल्ली प्रीमियर लीगचा पहिला हंगाम सुरु आहे. या लीगमध्ये एकूण पाच संघानी भाग घेतला असून नुकताच साऊथ दिल्ली सुपरस्टार्स विरुद्ध नॉर्थ दिल्ली स्ट्राईकर्स यांच्यामध्ये सामना झाला. या साम न्यात साऊथ संघाचा कर्णधार आयुष बदोनी याने ४४ चेंडूंमध्ये १६५ धावा ठोकल्या आहेत. या खेळीदरम्यान आयुषने ८ चौकारांसह १९ षटकार ठोकत नवा विक्रम केला. आयुषने टी-२० सामन्याच्या एका डावामध्ये १९ षटकार मारून 'द युनिव्हर्स बॉस' नावाने ओळखल्या जाणाऱ्या ख्रिस गेलचा विक्रम मोडीत काढला आहे.

## पाकिस्तानची शरणागती

**रावलपिंडी :** पाकिस्तान विरुद्ध बांगलादेश सामन्यात पाकिस्तानचा दुसरा डाव ४६.४ षटकात १७२ धावांवर संपुष्टात आला. पहिल्या डावातील १२ धावांच्या आघाडीमुळे त्यांनी बांगलादेशसमोर १८५ धावांचे आव्हान ठेवले. या सामन्यात सुरुवातीला पाकिस्तानने वर्चस्व राखले होते. परंतु, बांगलादेशच्या पुनरागमनामुळे ते पुन्हा बॅकफूटवर पडले. पहिल्या सामन्यात बांगलादेशने पाकिस्तानला १० गडी राखून पराभूत केले होते. यानंतर बांगलादेशने दुसऱ्या कसोटीतही विजय मिळवला, तर ते पाकिस्तानविरुद्ध पहिल्यांदाच कसोटी मालिका जिंकतील.

## दासची शतकी खेळी

**रावलपिंडी :** पाकिस्तान विरुद्ध बांगलादेश संघात दुसरा कसोटी सामना रावळपिंडी येथे सुरू आहे. हा दिवस पाकिस्तानसाठी आधी शाहजाद खुर्रमने गाजवला आणि त्यानंतर लिटन दास आणि मेहदी हसन मिराजने गाजवला. त्यांनी दमदार फलंदाजी करत अर्धशतके केली. त्यांच्यात दीडशतकी भागीदारी झाली. मेहदी ७८ धावांवर बाद झाला. यांतर लिटन दासला आघा सलमानने बाद केले. त्याने २२८ चेंडूत १३ चौकार आणि ४ षटकारांसह १३८ धावा केल्या. बांगलादेशचा संघ ७८.४ षटकात २६२ धावांवर सर्वबाद झाला.

# नितेशने पॅरिसमध्ये फडकवला तिरंगा

## पदवीधराची 'सुवर्ण' कामगिरी

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

**पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताच्या बॅडमिंटनपटूंनी आत्तापर्यंत चांगली कामगिरी केली आहे. सोमवारी (दि.२) भारताच्या नितेश कुमारने सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. हे भारताचे पॅरिस पॅरालिम्पिकमधील नववे पदक असून दुसरे सुवर्णपदक आहे. यापूर्वी नेमबाज अवनी लेखराने भारताला सुवर्णपदक जिंकून दिले आहे.**



नितेशचा सुवर्णपदकासाठीचा अंतिम सामना ग्रेट ब्रिटनच्या डॅनिएल बेथेलविरुद्ध झाला. शेवटपर्यंत रोमांचक ठरलेल्या या सामन्यात नितेशने १ तास २० मिनिटाच्या लढतीनंतर २१-१४, १८-२१, २३-२१ अशा फरकाने विजय मिळवला. या सामन्यात पहिला गेम सुरुवातीला रोमांचक झाला होता. पण पहिल्या गेमच्या मध्यानंतर नितेशने दमदार खेळ केला आणि हा गेम जिंकला. दुसऱ्या गेममध्येही पहिल्या गेमप्रमाणेच चित्र दिसले. नितेशने आघाडी घेतली होती. पण नंतर बेथेलने पुनरागमन करत बरोबरी साधली. त्याने दुसरा गेम जिंकला आणि सामना तिसऱ्या आणि निर्णायक सेटपर्यंत नेला. तिसरा गेम अत्यंत चुरशीचा झाला. दोन्ही खेळाडू हार मानण्यास तयार नव्हते. एकमेकांना वरचढ होण्याची संधी देत नव्हते २१-२१ अशी बरोबरीही झालेली. पण अखेरीस दोन गुण जिंकत नितेशने सुवर्ण पदकावर नाव कोरले.

### आयआयटी मंदीमधून शिक्षण

**२९ वर्षीय नितेशने आयआयटी मंदीमधून पदवीचे शिक्षण घेतले आहे. नितेश याचा २००९ मध्ये अपघात झाला होता, ज्यामुळे त्याचा पायाला दुखापत झाली होती. त्याला या दुखापतीमुळे कायमस्वरुपी पायात अपंगत्व आले होते. पण यानंतरही नितेशने त्याच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित करायचे ठरवले आणि त्याने २013 मध्ये आयआयटी मंदी येथे प्रवेश मिळवला. तिथे शिक्षण घेत असतानाच त्याच्यामध्ये बॅडमिंटनबद्दल रस निर्माण झाला. २01६ मध्ये त्याची पॅरा नॅशनल चॅम्पियनशीपसाठी हरियाणा संघात निवड झाली. २01७ मध्ये त्याने पहिले आंतरराष्ट्रीय विजेतेपद मिळवले होते. तसेच, आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेतही त्याने २01८ आणि २०२२ मध्ये दुहेरीत पदके जिंकली आहेत.**

### बॅडमिंटनमध्ये पदकांची आशा

**बॅडमिंटनमध्ये सुहास यथिराज, मुरुगेसन थुलासिमाथी, सुकांत कदम, मनीषा रामदास, शिवन नित्य श्री सुमथी हे देखील सोमवारी रात्री पदकांसाठी सामने खेळणार होते. पुरुष एकेरीत ४ प्रकारात यथिराज सुवर्णपदकासाठी, तर सुकांत कांस्यपदकासाठी खेळणार आहेत. तसेच, महिलांच्या एकेरी ५ प्रकारात थुलासिमाथी सुवर्णपदकासाठी आणि मनीषा कांस्यपदकासाठी खेळणार आहेत. शिवन नित्य श्री सुमथी महिलांच्या एकेरी ६ प्रकारात कांस्य पदकाचा सामना खेळणार आहेत. यामुळे भारताला बॅडमिंटनध्ये आणखी पदके मिळणार हे निश्चित आहे.**

# रहाणेचा लंडनमध्ये 'अजिंक्य' डंका



**। लंडन । वृत्तसंस्था ।**

भारताचा फलंदाज अजिंक्य रहाणे सध्या इंग्लंडमध्ये लिस्टरशायरकडून खेळत असून त्याने नुकतेच काउंटी क्रिकेटमध्ये शतक केले आहे. त्याच्या या खेळामुळे लिस्टरशायरला ग्लॅमॉर्गनविरुद्ध सामना अनिर्णत राखण्यात यश मिळाले आहे.

रहाणेने कार्डिफला झालेल्या या सामन्यात दुसऱ्या डावात १९२ चेंडूत १०२ धावांची खेळी केली होती. या खेळीत १३ चौकार आणि १ षटकार मारले. या सामन्यात लिस्टरशायरला पहिल्या डावात २९९ धावांची पिछाडी स्विकारावी लागली होती. यानंतर दुसऱ्या डावात त्यांची अवस्था ७४ धावांवर ३ बळी अशी अवस्था झाली होती.

पण अजिंक्य रहाणे आणि पीटर हँड्सकॉम्ब यांनी डाव सावरताना चौथ्या बळीसाठी १८३ धावांची भागीदारी केली. या भागीदारी दरम्यान रहाणेने शतक देखी पूर्ण केले. अजिंक्य रहाणेचे हे प्रथम श्रेणी क्रिकेटमधील ४० वे शतक होते. तो गेल्या काही सामन्यांमध्ये दमदार खेळ करत आहे.

लिस्टरशायरकडून एकदिवसीय चषकामध्येही खेळताना त्याने महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्याने १० सामन्यांत ४ अर्धशतके केली होती. विशेष म्हणजे १९ सप्टेंबर रोजी भारतीय संघाला बांगलादेशविरुद्ध कसोटी मालिका खेळायची आहे. यापूर्वी रहाणेने ही दमदार खेळी केली आहे. त्यामुळे आता त्याच्यासाठी पुनरागमनाचे दार उघडणार का, हे पाहावे लागणार आहे.

# द्रविडचा लेकाला मोलाचा सल्ला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



महाराजा टी-२० लीगमध्ये उल्लेखनीय कामगिरीमुळे चर्चेत आलेल्या समितची भारताच्या १९ वर्षांखालील संघात निवड करण्यात आली आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या ३ एकदिवसीय व २ चार दिवसीय सामन्यांसाठी राहुल द्रविडच्या लेकाची भारतीय संघात निवड झाली आहे. अष्टपैलू समितने १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत २०१६ मध्ये १२५ धावांची खेळी केली होती. त्याने २०१८ मध्ये कर्नाटक क्रिकेट संघटनेच्या १४ वर्षांखालील शालेय स्पर्धेत १५० धावा चोपल्या होत्या. २०१९ मध्येही १४ वर्षांखालील सामन्यात द्विशतकी खेळी केली होती. कुच बिहार ट्रॉफी २०२४ स्पर्धेतही कर्नाटकला विजय मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला होता. त्याने या स्पर्धेत ८ सामन्यांमध्ये ३६२ धावा केल्या आणि १६ बळी देखील घेतले होते. तसेच, आंतर विभागीय क्रिकेट स्पर्धेतही ४ सामन्यांत जवळपास १३० धावा ठोकल्या होत्या.

यावेळी त्याचे कोच कार्तिक जेस्वनाथ यांनी राहुल द्रविडने मुलाला दिलेल्या सल्ल्याबाबत सांगितले आहे. ते म्हणाले की, राहुलने मिळवलेल्या प्रसिद्धीत हरवून न जाता स्वतःच्या खेळावर लक्ष केंद्रीत करण्याचा त्याला सल्ला मिळाला होता. आपल्या वडिलांची प्रसिद्धी पाहत समित मोठा झाला आणि त्याला हे माहीत होते की त्याचे प्रचंड दडपण पुढे जाऊन असेल. यामुळेच राहुल आणि मी त्याला एक सल्ला दिला की, बाहेर काय चर्चा सुरू आहे किंवा काय घडतंय याची पर्वा करू नकोस. मैदानावर तू जी कामगिरी करशील त्यावरूनच तुझी निवड केली जाईल.

# 'यावेळीही भारताचेच वर्चस्व'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट संघ वर्षा अखेरीस ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यात भारताला बॉर्डर - गावसकर चषक या ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळायची आहे. या मालिकेचे वेळापत्रकही काही दिवसांपूर्वीच समोर आले आहे. याबाबत अनेक आजी-माजी खेळाडूंनी आपापली मतं मांडली आहेत. आता सुनील गावसकर यांनीही त्यांचे मत मांडले आहे. २०१४-१५ नंतर भारताने कधीही ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी मालिका गमावलेली नाही. यामुळेच यांच्या मालिकेला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. या मालिकेत आता यावेळीही भारताचेच ३-१ असे वर्चस्व राहिल, असे मत गावसकर यांनी मांडले आहे.

# इंग्लंडचा लॉर्ड्सवर विजय

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

इंग्लड क्रिकेट संघाने रविवारी (दि.१) श्रीलंकेविरुद्ध दुसऱ्या कसोटीत १९० धावांनी विजय मिळवला आहे. लॉर्ड्सवर मिळवलेल्या या विजयासह इंग्लंडने ३ सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-० अशी विजयी आघाडीही घेतली आहे. इंग्लंडच्या या विजयात गस ऍटकिन्सन आणि जो रुट यांचा मोठा वाटा राहिला आहे.



■ ग़स ऍटकिन्सन आणि जो रुट यांचा मोठा वाटा

■ मालिकेत २-० अशी विजयी आघाडी

या सामन्यात श्रीलंकेसमोर दुसऱ्या डावात इंग्लंडने ४८३ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेला ८६.४ षटकात सर्वबाद २९२ धावांच करता आल्या. श्रीलंकेकडून दिनेश चंदिमलने ५८ धावांची खेळी केली, तर दिमुथ करुणारत्नेने ५५ आणि कर्णधार धनंजय डी सिल्वाने ५० धावांची खेळी केली. तसेच, मिलन रत्नायकनेही ९ व्या क्रमांकावर फलंदाजीला येत ४३ धावांची झुंज दिली. मात्र, या डावातही श्रीलंकेला ऍटकिन्सन भारी पडला. त्याने ५ बळी घेतले. तसेच, ख्रिस वोक्सने २ आणि शोएब बशीरने १ बळी घेतला.

तत्पुर्वी, या सामन्यात इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना १०२ षटकात सर्वबाद ४२७ धावा केल्या होत्या. या डावात जो रुटने २०६ चेंडूत १४३ धावा केल्या. तसेच, गस ऍटकिन्सनने ११५ चेंडूत ११८ धावांची आक्रमक खेळी केली होती. श्रीलंकेकडून पहिल्या डावात गोलंदाजी करताना असिथा फर्नांडोने सर्वाधिक बळी घेतले होते. तसेच, मिलन रत्नायके आणि लहिरु कुमारा यांनी प्रत्येकी २ बळी तर प्रभात जयसूर्याने १ बळी घेतला.

# योगराज सिंग पुन्हा बरसले

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



भारताचा दिग्गज अष्टपैलू क्रिकेटपटू युवराज सिंग याचे वडील योगराज सिंग पुन्हा चर्चेच्या गर्तेत आले आहेत. त्यांनी नुकतेच एमएस धोनी आणि कपिल देव या भारताच्या विश्व चषक विजेत्या कर्णधारांवर कडू शब्दात टीका केली आहे. यामुळे सोशल मीडियावर त्यांना ट्रोलचाही सामना करावा लागत आहे.

दरम्यान, योगराज यांनी धोनी आणि कपिल देव यांच्यावर यापूर्वी अनेकदा टीका केली आहे. आता पुन्हा एकदा त्यांच्यावर निशाणा साधला असून यावेळी कपिल देव यांच्यावर राग व्यक्त केला आहे. तसेच, योगराज यांनी कपिल देव आणि युवराज सिंग यांच्या कामगिरीची तुलना केली आहे. त्यांनी एकप्रकारे युवराजच्या माध्यमातून कपिल देव यांच्याबरोबरचा बदला पूर्ण केल्याच्या भावनाही व्यक्त केल्या आहेत.

योगीराज यांनी दावा केला होता की, योगराज यांना १९८१ मध्ये कपिल देव यांनी संघातून बाहेर केले होते, त्यानंतर त्यांच्यात वितुष्टता आली होती. त्यांनी म्हटले होते की, कपिल त्यांना त्यांचे सर्वात मोठे स्पर्धेक मानत होते. या घटनेनंतर योगराज यांनी बदला घेण्याचा निर्णय घेत आपल्या मुलाला क्रिकेटपटू बनवण्याचा निर्णय घेतला होता.

त्यांना योगराज काय आहे, हे जगाला दाखवायचे होते. योगराज पुढे म्हणाले की, मी त्या वक्तीबद्दल बोलत आहे, तो व्यक्ती म्हणजे तुमचा सर्वकालिन दिग्गज कर्णधार मिस्टर कपिल देव. मी त्याला सांगितले होते की, मी तुझे ते हाल करेन की जग तुझ्यावर थुंकेल. आज युवराजकडे १३ ट्रॉफी आहेत आणि त्याच्याकडे फक्त एक विश्वचषक आहे.

# बोपण्णा-अल्दिलाची उपांत्य फेरीकडे वाटचाल

**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**

भारताचा टेनिसपटू रोहन बोपण्णा व त्याची इंडोनेशियाची जोडीदार अल्दिला सुतजियादी या जोडीने अमेरिकन ओपन टेनिस या ग्रँडस्लॅमच्या उपांत्यपूर्व फेरीत वाटचाल केली आहे. रोहन-अल्दिला या आठव्या मानांकित जोडीसमोर ऑस्ट्रेलियाचा जॉन पिअर्स व झेक प्रजासत्ताकची त्याची साथीदार कॅटरिना सिनीकोवा या जोडीचे आव्हान होते. मात्र, या जोडीने माघार घेतल्यामुळे रोहन-अल्दिला या जोडीला पुढे चाल देण्यात आली आहे. पुढल्या फेरीत रोहन-अल्दिला या जोडीसमोर मॅथ्यू एब्डेन-बार्बोरा क्रेझीकोव्हा या जोडीचे आव्हान असणार आहे.



जॉन-कॅटरिना या जोडीने पहिला सेट ६-० असा जिंकत आघाडी मिळवली होती. यानंतर दुसऱ्या सेटमध्ये दोन्ही जोड्यांमध्ये कडवा संघर्ष पाहायला मिळाला. अखेर रोहन बोपण्णा-अल्दिला सुतजियादी या जोडीने हा सेट ७-६ असा जिंकत बरोबरी साधली होती. मात्र, याचदरम्यान जॉन-कॅटरिना या जोडीने माघार घेतली. यामुळे एक तास व १३ मिनिटांच्या खेळानंतर ही लढत थांबवण्यात आली व रोहन-अल्दिला या जोडीला उपांत्यपूर्व फेरीत वाटचाल मिळाली आहे.

# चौथ्या पदकापासून दूरच

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

भारताची नेमबाज अवनी लेखरा हिला पॅरालिम्पिकमधील चौथ्या पदकापासून दूरच रहावे लागले आहे. टोकियो पॅरालिंपिकमध्ये दोन पदकांची कमाई केल्यानंतर अवनी हिने पॅरिसमध्येही १० मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्णपदक पटकावत आपली चमक दाखवली आहे. मात्र, रविवारी (दि.१) पार पडलेल्या १० मीटर एअर रायफल प्रोन (एसएस१) या मिश्र प्रकारात तिच्याकडून निराशा झाली. सिद्धार्थ बाबू १० मीटर एअर रायफल प्रोन (एसएस १) व श्रीहर्षा दवारेड्डी (एसएच २) यांनाही अपयशाचा सामना करावा लागला. अवनी हिची ११व्या, तर सिद्धार्थ याची २८व्या आणि श्रीहर्षा याची २६व्या स्थानावर घसरण झाली आहे.



अवनीने १० मीटर एअर रायफल (एसएस१) प्रकारात सुवर्णपदक पटकावताना देदीप्यमान कामगिरी केली होती. त्यामुळे मिश्र प्रकारातही तिच्याकडून मोठी अपेक्षा बाळगली जात होती. परंतु, तिला १०५.७, १०६.०, १०४.१, १०६.०, १०४.८, १०६.२ अशी गुणांची कमाई करता आली.

# नायरची विक्रमी कामगिरी

**तमिळनाडू:** महाराजा ट्रॉफी स्पर्धेत मैसूर वॉरियर्सने जेतेपद पटकावताना अंतिम सामन्यात बंगळुरू ब्लास्टर्सचा पराभव केला आहे. तसेच, स्पर्धा इतिहासात पहिल्यांदाच हे चषक जिंकले आहे. यावेळी कर्णधार करुण नायरचा या संपूर्ण स्पर्धेत दबदबा दिसला. त्याने या पर्वात सहा अर्धशतकी खेळी करताना अनेक विक्रमांची नोंद केली आहे. आयपीएलच्या २०२५ साठी होणाऱ्या ऑक्शनपूर्वी करूण नायरने ५६च्या सरासरीने ५६० धावांची खेळी केली आहे. नायरने या खेळीत मंगळुरू ड्रॅगन्सविरुद्ध ४८ चेंडूंत नाबाद १२४ धावांची सर्वोत्तम खेळी नोंदवली. या स्पर्धेतील ही फलंदाजाची सर्वोत्तम खेळी ठरली आहे. महाराजा ट्रॉफीच्या एका पर्वात सर्वाधिक ५६० धावांचा विक्रम करुण नायरने पुन्हा आपल्या नावावर नोंदवला आहे. मागील पर्वात त्याने ५३२ धावा केल्या होत्या. यानंतर अभिनव मनोहर (५०७) आणि मयांक अग्रवाल (४९६) यांचा क्रमांक येतो.

## पहिल्या प्रयत्नात हंगामातील सर्वोत्तम कामगिरी

# कथुनियाचे कांस्यपदकार समाधान

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

**पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताच्या योगेश कथुनियाने पुरुषांच्या ५६ थाळीफेक प्रकारात रौप्यपदकाची कमाई केली आहे. स्लोव्हाकियाच्या ड्युसान लॅक्झोने पहिल्या प्रयत्नात ४१.२० मीटर लांब थाळी फेकली आणि सहा प्रयत्नानंतरही हा प्रयत्न सर्वोत्तम राहिला. तीन वेळच्या जागतिक विजेत्या क्लाऊडी बतीस्टाने त्याच्या दुसऱ्या प्रयत्नात ४६.४५ मीटर लांब थाळी फेकली आणि तो पहिल्या क्रमांकावर गेला. यावेळी त्याने स्वतःचाच पॅरालिम्पिक विक्रम मोडीस काढला आहे.**

४५ वर्षीय बतीस्टाने २०१२च्या लंडन पॅरालिम्पिक स्पर्धेत भालाफेकीत रौप्यपदक जिंकले होते. त्याने यंदा त्याच्या पाचव्या प्रयत्नात ४६.८६ मीटर थाळी फेकून भारतीय खेळाडू समोर तगडे आव्हान उभे केले होते. योगेशने त्याच्या पहिल्या प्रयत्नात ४२.२२ मीटर लांब थाळी फेकली आणि ही त्याची हंगामातील सर्वोत्तम कामगिरी ठरली. पण, त्याला या पुढे मजल मारता न आल्याने सुवर्णपदकाच्या शर्यतीतून बाहेर पडावे लागले असून रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. ग्रीसच्या कॉन्स्टँटिनोस त्झोनिसने ४१.३२ मीटरसह कांस्यपदकावर मोहोर उमटवली.



### योगेश कथुनियाचा प्रवास

**योगेशने २020च्या टोकियो पॅरालिम्पिकमध्ये पुरुषांच्या थाळीफेक एफ-५६ स्पर्धेत रौप्यपदक जिंकले होते. कथुनियाचे वडील हे भारतीय सैन्यात होते. वयाच्या ९ व्या वर्षी योगेशला गुइलेन-बॅरे सिंड्रोम (स्नायूंची वाढ खुंटणे) आजार झाला. त्याच्या आईने फिजिओथेरपी शिकली आणि ३ वर्षांच्या आत त्याला पुन्हा स्नायूंची ताकद मिळवून दिली. यानंतर २01०६ मध्ये योगेशने पॅरा स्पोर्ट्स खेळण्यास सुरुवात केली. त्याने बर्लिन येथे २01८ च्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स युरोपियन चॅम्पियनशिपमध्ये ४५.१८ मीटरवर थाळी फेकून ३६ प्रकारात विश्व विक्रम नोंदवला होता. २020 च्या पॅरालिम्पिकमध्ये रौप्यपदकासाठी त्याला अर्जुन पुरस्काराने गौरविण्यात आले. योगेशने जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत २०२३ व २०२४ मध्ये रौप्य आणि २०१९ मध्ये कांस्यपदक जिंकले आहे.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)